हॉटेल जॉब-सुपरवायझर
१० वी पास/नापास ( वय वर्ष १८ पूर्ण)
१२,०००/- पगार
राहणे/जेवण/फ्री
संपर्क- पाटील ब्रदर्स हॉटेल
पांडवादेवी, पो. पोयनाड
मो.नं. ८६९८७६०००२/८६९८७६०००८
८६९८७६०००५


# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. ३ जून २०२४

किंमत ४ ₹





आजचा अग्रलेख
**निकालांआधीचे निकाल**

वेधक

## केजरीवाल यांचे आत्मसमर्पण

**नवी दिल्ली :** अरविंद केजरीवाल यांनी रविवारी (दि.२) दुपारी तिहार तुरुंगात आत्मसमर्पण केले. दिल्ली मद्य धोरणप्रकरणी ईडीने केलेल्या अटकेनंतर लोकसभा निवडणूक प्रचारासाठी त्यांना सर्वोच्च न्यायालयाने २१ दिवसांचा अंतरिम जामीन मंजूर केला होता. याची मुदत शनिवार १ जून रोजी संपली होती. आत्मसमर्पणापूर्वी दुपारी तीन वाजता केजरीवाल आपल्या निवासस्थानातून राजघाटवर गेले. येथे त्यांनी महात्मा गांधी यांना आदरांजली वाहली. यानंतर केजरीवाल आणि त्यांच्या पत्नी यांनी कॅनॉट प्लेस येथील हनुमान मंदिरात दर्शन घेतले. त्यानंतर केजरीवाल हे आम आदमी पार्टी कार्यालयात पोहोचले. पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधताना त्यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.

## मान्सूनची कर्नाटकात धडक

**नवी दिल्ली :** केरळमध्ये दाखल झालेला मान्सून तामिळनाडूमधून पुढे सरकला असून, आता कर्नाटकात धडकला आहे. अद्याप मुंबईसह महाराष्ट्राला मान्सूनची प्रतीक्षा आहे. महाराष्ट्रात पुढील आठवड्यात मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. तर, ३ आणि ४ जून रोजी मुंबई, ठाणे जिल्ह्यांसह महाराष्ट्रात इतर काही भागात मान्सूनपूर्व पावसाची शक्यता वर्तवली जात आहे. केरळमध्ये यंदा मान्सून दोन दिवस आधीच दाखल झाला आहे. महाराष्ट्रात १० किंवा ११ जून रोजी मान्सून दाखल होण्याची शक्यता याआधीच भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे.

### सिक्कीम विधानसभा निवडणुकीत

# भाजपच्या हाती ‘भोपळा’

**। सिक्कीम । वृत्तसंस्था ।**

**सिक्कीम विधानसभेच्या निवडणुकीत ३२ पैकी ३१ जागा जिंकून सत्ताधारी सिक्कीम क्रांतीकारी मोर्चा पक्ष पुन्हा सत्तेत विराजमान होणार आहे. सिक्कीमचे मुख्यमंत्री आणि पक्षाचे नेते प्रेमसिंग तमांग यांनी रेनॉक मतदारसंघात त्यांचे सिक्कीम डेमोक्रॅटिक फ्रंट प्रतिस्पर्धी सोम नाथ पौड्याल यांच्यावर सात हजार ४४ मतांच्या फरकाने विजय मिळवला आहे. तर, अरुणाचल प्रदेशमध्ये अभूतपूर्व यश मिळवणाऱ्या भाजपाला सिक्कीममध्ये साधं खातंही उघडता आलेलं नाही.**



गंगाटोक येथे पक्ष कार्यालयात जल्लोष सुरू झाला आहे. यावेळी सिक्कीमचे मुख्यमंत्री तमांग यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, आम्ही जिंकलो आहोत. २०१९ ला सरकार स्थापन झाल्यानंतर अनेक अडचणी आल्या. कोरोनोचा काळ, चक्रीवादळ, पूरस्थिती अशा परिस्थितीही सिक्कीम क्रांतीकारी मोर्चाने सिक्कीमच्या लोकांसाठी काम केलं होतं. त्यामुळे या विजयाचं श्रेय मी सिक्कीमच्या जनतेला देतो. पूर्व मुख्यमंत्री पवन चामलिंग यांना आम्ही हरवलं आहे. सिक्कीम क्रांतीकारी मोर्चाने मनापासून प्रत्येक मतदारसंघात काम केलं होतं. त्या कामाची पावती पान २ वर

## अरुणाचल प्रदेशमध्ये भाजप

**लोकसभा निवडणूक निकालाच्या आधीच भारतीय जनता पक्षामध्ये जल्लोष सुरू झाला आहे. १९ एप्रिल रोजी झालेल्या अरुणाचल प्रदेश विधानसभा निवडणुकीत भाजपाने ४६ जागांवर विजय मिळवला असून मागच्या टर्मचा स्वतःचाच रेकॉर्ड त्यांनी मोडला आहे. त्यामुळे भाजपा पुन्हा एकदा अरुणाचल प्रदेशमध्ये सत्ता स्थापन करण्यास सज्ज झाली आहे. त्यामुळे, अरुणाचल प्रदेशमध्ये तिसऱ्यांदा पेमा खांडू मुख्यमंत्री पदावर विराजमान होणार आहेत. अरुणाचल प्रदेशमध्ये ६० विधानसभा जागांसाठी १९ एप्रिल रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. येथे ८२.९५ टक्के मतदान झाले. तर, आज सकाळपासून मतमोजणीला सुरुवात झाली. अरुणाचल प्रदेशमध्ये भाजपाला सुरुवातीलाच १० जागांवर बिनविरोध विजय मिळाला. तर, निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळानुसार भाजपाच्या पारड्यात ४६ जागा गेल्या आहेत. तिथं बहुमतासाठी ३१ जागा गरजेच्या आहेत. त्यामुळे अरुणाचल प्रदेशमध्ये भाजपा एकहाती सत्ता स्थापन करणार आहे.**

# राज्यात महायुतीला आत्मचिंतनाची गरज

### एकनाथ खडसे यांच्या कानपिचक्या

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

महाराष्ट्रात जे फोडाफोडीचं राजकारण झालंय, त्याचा फटका भाजपाला बसताना दिसतोय. राज्यभरात फोडाफोडीचं राजकारण मतदारांनी अमान्य केलं आहे. अजित पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष घेतला. उद्धव ठाकरेंचा पक्ष एकनाथ शिंदेंकडे गेला. मूळ पक्ष ज्यांचा आहे, ज्यांनी रात्रंदिवस परिश्रम करून हे पक्ष उभे केले, त्यांच्या हातून ते इतरांच्या हातात जाणं या फोडाफोडीच्या राजकारणाचा हा परिणाम आहे, असं एकनाथ खडसे म्हणाले.



निवडणुकांपूर्वी भाजपामध्ये प्रवेशाचा मानस उघडपणे बोलून दाखवणारे एकनाथ खडसे यांनी भाजपालाच कानपिचक्या दिल्या आहेत.

राज्यात मात्र फोडाफोडीचे राजकारण आणि शेतकऱ्यांच्या समस्या पाहता जनतेला हे फारसे रुचलेल दिसत नसल्याचं पाहायला मिळत आहे. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीनं आत्मचिंतन करण्याची गरज असल्याचं एकनाथ खडसे यांनी म्हटलं आहे.

या प्रकारांमुळेच अजित पवारांना या निवडणुकीत फारसा प्रतिसाद दिसत नाहीये. एकनाथ शिंदेंनाही फारसा प्रतिसाद दिसत नाही. उद्धव ठाकरेंचा पक्ष राज्यात दुसऱ्या क्रमांकाचा राहील. शरद पवारांच्या १० पैकी ८ किंवा ६ जागा जिंकून येतील असं एक्झिट पोलमध्ये समोर आलं आहे, अशा शब्दात एकनाथ खडसेंनी भाजपाबरोबरच अजित पवार गट व एकनाथ शिंदे गटाला लक्ष्य केले.

### पालीची शुद्ध पाणीपुरवठा योजना अडकली लालफितीत

# ग्रामस्थ शुद्ध पाण्याच्या प्रतिक्षेत

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली शहरातील जनतेला वर्षानुवर्षे शुद्ध पाण्याची प्रतीक्षा आहे. विविध राजकीय पक्ष, नेते, राजकारण्यांच्या फसव्या आश्वासनांचा पालीकरांना वीट आल्याची परिस्थिती दिसून येते. पाली शहरासाठी शुद्धपाणी योजना ही १९७४ साली मंजूर झाली आहे. तिचा एकूण खर्च आता २७ कोटींवर गेला आहे. मात्र, ही शुद्ध पाणीपुरवठा योजना लालफितीत अडकली आहे. राजकीय हेवेदावे आणि प्रशासकीय बाबींमध्ये ही योजना अडकल्याने पालीकर शुद्ध पाण्याच्या प्रतिक्षेत आहेत. पालीकरांना थेट अंबा पान २ वर

## भाविक व पालीकरांचे आरोग्य धोक्यात



**पालीकरांना येथील अंबा नदीचे पाणी नळाद्वारे पुरविण्यात येते. वितरित होणाऱ्या या पाण्यावर कोणतेही शुद्धीकरण व क्लोरीनेशनची प्रक्रिया न करता थेट पालीकरांना पाणी पुरविले जाते. अशा प्रकारे कित्येक वर्षे पालीकरांच्या आरोग्याशी खेळले जात आहे. पाली हे अष्टविनायक क्षेत्र आहे. येथे रोज हजारो भाविक येत असतात. पालीची स्थायी लोकसंख्यादेखील पंधरा हजारांहून अधिक आहे. अशा परिस्थितीत भाविक व नागरिकांना नाईलाजाने हे गढूळ व खराब पाणी प्यावे व वापरावे लागत आहे. आत्तापर्यंत येथील नळांतून चक्क जिवंत साप, खुबे, शिंपले, मासे आणि किडे अनेकवेळा बाहेर आले आहेत. गाळ, चिखल आणि शेवाळ येणे हे तर नेहमीचेच आहे.**

# भातबियाणे खरेदीची लगबग

**प्रमोद जाधव**
**। अलिबाग ।**

मान्सूनने केरळात वर्दी देताच शेतकऱ्यांनी भात बियाणे खरेदीला सुरुवात केली असून, जिल्ह्यातील बियाणे, खत विक्री केंद्रात खरेदीची लगबग सुरु झाली आहे. आतापर्यंत दहा टक्के खरेदी झाली असल्याची माहिती जिल्हा परिषद कृषी विभागाकडून देण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये भाताचे ९८ हजार ९१९ हेक्टर क्षेत्र असून, जिल्ह्यात दोन लाखांहून अधिक भात उत्पादक शेतकरी आहेत. पावसाळा तोंडावर आल्याने जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी धूळवाफे पेरणीची लगबग सुरू झाली असून, काही ठिकाणी बियाणे खरेदीला सुरुवात झाली आहे. जिल्ह्यामध्ये एकूण क्षेत्रापैकी दहाटक्केक्षेत्रामध्येबियाणांचीलागवड केली जाणार आहे. त्यानुसार कृषी विभागाने १६ हजार २५० क्विंटल बियाणांची मागणी केली आहे. त्यापैकी २५ मेपर्यंत ८४०० क्विंटल भात बियाणे उपलब्ध झाले आहे. बियाणांबरोबरच खतांचीदेखील गरज निर्माण होणार आहे.

त्यामुळे १७ हजार मेट्रिक टन इतक्या खताची मागणी केली आहे. त्यात ११ हजार ५०० मेट्रिक टन युरीया खताची मागणी केली आहे. परंतु, आतापर्यंत एक हजार ९२० मेट्रिक टन खताचा पान २ वर

## खत खरेदी करताना आधारकार्ड गरजेचे

**जिल्ह्यामध्ये भात बियाणांबरोबरच खताचीदेखील मागणी अधिक आहे. शेतकऱ्यांना युरिया, १५:१५: सुफलासारखी खते अनुदानातून दिली जाणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी खत खरेदी करताना आधारकार्ड सोबत घेऊन जावे, असे आवाहन जिल्हा परिषद कृषी विभागाने केले आहे.**

**भात खरेदीला सुरुवात झाली आहे. बियाणांसह खतेदेखील उपलब्ध झाली आहेत. शेतकऱ्यांना भात पेरणीसाठी बियाणांचा तुटवडा निर्माण होणार नाही, याची काळजी घेतली आहे. खतांबाबतही नियोजन केले आहे. शेतकऱ्यांनी मान्यता प्राप्त दुकानांमधूनच खत व बियाणे खरेदी करावे.**
**– मिलिंद चौधरी, कृषी अधिकारी, कृषी विभाग, रायगड जिल्हा परिषद**

## जिल्ह्यात आतापर्यंत दहा टक्के खरेदी

### रिलायन्सच्या रसायनमिश्रित

# पाण्यामुळे शेतीचे नुकसान

**। शिहू । वार्ताहर ।**

नागोठणेजवळील पेण तालुक्यातील शिहू ग्रामपंचायत हद्दीतील चोळे येथील शेतकरी लक्ष्मण पोशा कुथे यांच्या शेतात रिलायन्स कंपनीच्या रसायनमिश्रित पाण्याची लाइन फुटल्याने शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यावर उपासमारीची वेळ आली आहे. शेतीच्या नुकसानाची रिलायन्स कंपनी भरपाई देण्यास टाळाटाळ करत असल्याचा आरोप नुकसानग्रस्त शेतकरी लक्ष्मण कुथे यांनी केला आहे.

पावसाळा तोंडावर आला असून, ऐन पेरणीच्या दिवसात शेतीच्या झालेल्या नुकसानीमुळे शेतकरी हवालदिल झालेला आहे.




चोळे येथील शेतकरी लक्ष्मण पोशा कुथे यांच्या शेतातून रिलायन्स कंपनीची रसायनमिश्रित पाण्याची लाइन गेली असून, आठ दिवसांपूर्वी ती फुटली आहे. यामुळे शेतीत सर्वत्र पाणीच पाणी भरले आहे. त्यांच्या कुटुंबात कोणीही कमवता नसून, पूर्ण कुटूंब शेतीवर अवलंबून आहे. यातच झालेल्या नुकसानीमुळे संपूर्ण कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. याबाबत त्यांनी रिलायन्स व्यवस्थापनाकडे वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, तो होऊ शकला नाही.

वर्षभर शेतीची डागडुजी, बांधबंदिस्ती करून ऐन पावसाच्या तोंडावर शेतीच्या झालेल्या नुकसानामुळे शेतकऱ्याचे अश्रू अनावर झाले. वर्षभर ज्या शेतीवर आपले कुटुंब पान २ वर

## एक्झिट पोल बोगस - कडू

**। अमरावती । वृत्तसंस्था ।**

तुमचे एक्झिट पोल म्हणजे बोगस. त्याला काही आधार नाही. एक्झिट पोल देणारे काही ब्रम्हदेव नाही. आमचा सामाजिक अभ्यास आहे, अशी प्रतिक्रिया प्रहारचे नेते आमदार बच्चू कडू यांनी दिली. एक्झिट पोलनुसार आलेल्या अंदाजामुळे अमरावतीत भाजप उमेदवार नवनीत राणा या आघाडीवर आहेत, तर काँग्रेसकडून उमेदवारी मिळालेले बळवंत वानखेडे आणि प्रहारचे उमेदवार दिनेश बूब हे पिछाडीवर असल्याचे समोर आले आहे. बच्चू कडू म्हणाले, एक्झिट पोलचे आकडे आणि खरा निकाल यात तफावत असते, एक्झिट पोलमध्ये फार काय खरे नसते. निकालाच्या दिवशी सर्व गोष्टी स्पष्ट होतील.

### पुढील दोन महिने मासेमारीवर बंदी; किनाऱ्यावर कोळी बांधवांची लगबग

# मान्सून येताच बोटी विसावल्या

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

भारतात मान्सूनचे आगमन झालं असून, तो केरळसह तामिळनाडूपर्यंत पोहोचला आहे. मान्सून दाखल झाल्याने मासेमारी हंगाम १ जून ते ३१ जुलै असा दोन महिने बंद राहणार आहे. त्यामुळे जिल्हाभरातील मासळीचे लिलाव बंद होऊन कोट्यवधींची उलाढाल ठप्प होणार आहे. त्यामुळे कोळी बांधवांनी आपल्या बोटी किनारी आणून शाकारण्यास सुरुवात केली आहे. जिल्ह्यातील अलिबागसह अनेक बंदरांवर बोटी नांगरून ठेवण्यात आल्याचे दिसून येत आहे. पान २ वर

**मोठ्या होड्या एक महिना अगोदर उभ्या केल्या आहेत. लहान होड्या बंदर किनारी नांगरण्यास आठवड्यापासून सुरुवात झाली आहे. सध्या बोटीवर प्लास्टिक आवरण टाकण्याचे काम सुरु आहे.**
**– विजय गिदी, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघ, मुंबई**

## म्हणून मासेमारीवर बंदी

**माशांच्या प्रजननासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून किनारपट्टी भागात दरवर्षी ही बंदी करण्यात येते. त्याचबरोबर पावसाळ्याचे दोन महिने समुद्रातील हवामान खराब असते. त्यामुळे बोटी समुद्रात नेण्यास मनाई करण्यात येते. १ ऑगस्टनंतर नियमितप्रमाणे मासेमारीच्या नव्या हंगामाला प्रारंभ होतो.**





# शालेय साहित्य खरेदीला वेग

**। रायगड । प्रतिनिधी ।**

उन्हाळ्याची सुट्टी संपायला आणि शाळा सुरू व्हायला काही दिवस शिल्लक राहिले आहेत. १० जूनपासून राज्यातील शाळा सुरू होणार असल्यामुळे पालकांसह चिमुकल्यांची शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी लगबग सुरू झाली आहे.

पुस्तके, वह्या, वेगवेगळ्या प्रकारच्या पेन्सिल, कंपास बॉक्स आणि स्टेशनरी अशा वस्तू खरेदी करण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील बाजारात गर्दी होत आहे. काही दिवसांनी शाळा सुरू होत असल्याने विक्रीला तेजी येणार आहे, असे दुकानदारांचे म्हणणे आहे. शाळा सुरू होण्यापूर्वी नवीन दप्तर, गणवेश, सॅण्डल-बूट, वह्या-पुस्तके, त्यांचे कव्हर, कंपास पेटी, पेन यांसह अन्य साहित्य खरेदी करण्यासाठी विद्यार्थी आणि पालकांची बाजारात गर्दी वाढू लागली आहे. अभ्यासात कोणत्याही बाबतीत मुलांना काही कमी पडू नये, यासाठी पालकही काटकसर करून विद्यार्थ्यांची हौस पूर्ण करत आहेत. शाळा सुरू होणार म्हणून विद्यार्थ्यांनाही नवा वर्ग, मित्रांच्या भेटीची उत्सुकता लागलेली आहे. दुसरीकडे पालकांना केवळ शाळेचे साहित्य नव्हे, तर शाळेत सोडण्यासाठी असणारी वाहने, शाळेचे शुल्क आणि अन्य खर्च करावा लागणार आहे. यंदा बाजारपेठेत मुलांच्या आवडीनुसार कार्टून, गाड्यांची चित्रे, खेळाडू, निसर्ग यांची चित्रे वह्यांवर दिसत आहेत. विविध रंगांच्या, कार्टुनची चित्रे असणाऱ्या व विविध आकाराच्या स्कूल बॅग बाजारात आल्या आहेत.

(संग्रहित छायाचित्र)



### कार्टून कंपास बॉक्स बाजारात

मुलांची दप्तरातील कंपास बॉक्स ही सर्वांत महत्त्वाची आणि आवडती वस्तू असते. यासाठी गेम्स, कार्टून अशा आवडत्या आकारातील कंपास बॉक्स बाजारात उपलब्ध झालेल्या आहेत. हे बॉक्स साधारण १०० ते ५०० रुपयांपर्यंत मिळत आहेत.

### एअर टाइट लंच बॉक्सला पसंती

कार्टून्सची चित्रे असलेल्या वॉटरबॅग, टिफीन बॉक्स जरी मुलांना आवडत असले, तरी हल्ली एअर टाइट लंच बॉक्सला पालकांकडून पसंती मिळते. आपल्या पाल्याला गरमा-गरम अन्न मिळावे; तसेच बॉक्समधून अन्न सांडू नये, यासाठी एअर टाइट टिफीन बॉक्सला मागणी वाढत आहेत. या टिफिनच्या किमतीही वेगवेगळ्या प्रतीनुसार १०० रुपयांपासून पुढे आहेत.

### शालेय पुस्तकांची विक्री कमी

मोफत शिक्षण हक्क कायद्यानुसार पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शाळेतूनच पुस्तके देण्यात येतात. या पुस्तकांच्या संचामध्ये एखादे पुस्तक कमी असेल किंवा आलेले नसेल, तरच पालक संबंधित पुस्तक दुकानांमधून विकत घेतात. पुढील वर्गात गेलेल्या विद्यार्थ्यांनी वापरलेली पुस्तके कमी किमतीत घेतली जात आहेत. त्यामुळे शालेय पुस्तकांची विक्री कमी होत आहे, असे विक्रेत्यानी सांगितले.

## एक्झिट पोलने वाढवली रायगडातील कार्यकर्त्यांची धडधड

**। तळा । वार्ताहर ।**

शनिवारी विविध प्रसारमाध्यमांनी दर्शविलेल्या एक्झिट पोलमुळे रायगडातील कार्यकर्त्यांची धडधड वाढली असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. रायगड लोकसभेसाठी महायुतीकडून सुनील तटकरे तर इंडिया आघाडीकडून अनंत गीते एकमेकांच्या विरोधात निवडणुकीच्या रिंगणात उभे ठाकले होते.

२०१४ साली झालेल्या खासदारकीच्या निवडणुकीत सुनील तटकरे यांचा निसटता पराभव झाला होता. २०१९ च्या निवडणुकीत अनंत गीते यांना पराभवाला सामोरे जावे लागले होते. मात्र आता राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली असल्याने सर्वच गणिते बदललेली आहेत. याआधी अनंत गीते यांनी शिवसेना, भाजप व आरपीआयच्या माध्यमातून निवडणूक लढवली होती.तर सुनील तटकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस, शेकाप व काँग्रेस युतीतून निवडणूक लढवली होती. आता मात्र शिवसेना आणि राष्ट्रवादीमध्ये पडलेल्या दोन गटानंतर पूर्णतः समीकरणे बदलली असून या निवडणुकीत अनंत गीते शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी शरद पवार गट,काँग्रेस व शेकाप या इंडिया आघाडीकडून निवडणुक लढले आहेत. तर दुसरीकडे सुनील तटकरे यांनी राष्ट्रवादी अजित पवार गट, शिवसेना शिंदेगट व भाजप आणि आरपीआय या महायुतीतून निवडणुकीला सामोरे गेले आहेत. ज्या अल्पसंख्याक मतांच्या जोरावर सुनील तटकरे आघाडीवर असायचे त्या मुस्लिम समाजाने या निवडणुकीत अनंत गीते यांना भरभरून मतदान केले असल्याचे चित्र दिसत होते. त्यामुळे नक्की कोणाचे पारडे जड आहे, हे सांगणे यावेळी जाणकारांनाही कठीण जात आहे.

# रविवारी मुरूड-बीचवर तुरळक गर्दी!

## उन्हाच्या काहिलीचा पर्यटनाला फटका



**। कोर्लई । वार्ताहर ।**

पर्यटनात जून महिन्याच्या पहिल्या रविवारी मुरूड-बीचवर तुरळक प्रमाणात गर्दी दिसून येत होती. उन्हाच्या काहिलीचा पर्यटनावर परिणाम दिसून आला तर काही पर्यटकांनी रखरखत्या उन्हात समुद्रात पोहोण्याचा मनसोक्त आनंद लुटला.

मरूड बीचवर पर्यटकांची मे महिन्याच्या तिसऱ्या, चौथ्या विकेंडला गर्दी पहावयास मिळाली होती. मे महिना संपून जून महिन्याच्या पहिल्या रविवारी तापमानाचा परिणाम कमी प्रमाणात गर्दी दिसून येत होती. मुरूड बीच व काशीद बीच हे पर्यटनात जगप्रसिद्ध असल्यामुळे या बीचवर पर्यटकांची सातत्याने वाढती वर्दळ असते.

पर्यटनात पुणे, सांगली, सातारा, कराड, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, औरंगाबाद, अहमदनगर, नाशिक, नागपूर, धुळे यवतमाळ अशा महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून तसेच महाराष्ट्राच्या बाहेरून व देश विदेशातून पर्यटक मरूडला भेट देत असतात.

मुरूड समुद्रकिनाऱ्यावरील रुपेरी वाळू, निळाशार समुद्र, समुद्रामध्ये मध्यभागी असलेला पद्मदुर्ग, नारळीपोफळीच्या बागा यामुळे पर्यटक मुरूडकडे आकर्षित होत आहे. काशीद बीचवर असणारी रुपेरी वाळू, सुरुचे बन त्यामुळे पर्यटक काशीद बीचला मोठ्या प्रमाणात भेट देत असतात. परंतु, जून महिन्याच्या पहिल्या रविवारी तापमानाचा परिणाम पर्यटकांची कमी प्रमाणात गर्दी दिसून येत होती.याची झळ पर्यटन व्यवसायाला बसली.

## अनिल शांताराम मुंबईकर सेवानिवृत्त

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील एनएडी या कंपनीचे कनिष्ठ व्यवस्थापक अनिल शांताराम मुंबईकर हे ३७ वर्षे सेवा दिल्यानंतर सेवानिवृत्त झाले. त्यांचा सेवानिवृत्तीचा कार्यक्रम वेश्वी येथे मान्यवरांच्या उपस्थितीत मोठया उत्साहात संपन्न झाला.

यावेळी अध्यक्ष स्थानी हभप गोपीनाथ ठाकूर, पनवेल मनपा चिटणीस शंकर म्हात्रे, एकनाथ मोकल, एनएडीचे कनिष्ठ व्यवस्थापक प्रवीण कर्पे, सुनंदा पेढमकर, वेश्वीच्या सरपंच प्रमिला महेंद्र मुंबईकर, अपर्णा मुंबईकर, त्रिंब्यकशेठ मुंबईकर, सिडको युनियन माजी अध्यक्ष रोहिदास मुंबईकर, जयराम मुंबईकर, गुणवंत कामगार विलास मुंबईकर, सुधीर मुंबईकर, परशुराम घरत, वैजनाथ मुंबईकर, सुहास मुंबईकर, डी. आर. ठाकूर, ज्ञानदेव ठाकूर, रामनाथ मुंबईकर, संध्या मुंबईकर, ॲड. विनायक मुंबईकर, ॲड नितीन मुंबईकर, हरिदास मुंबईकर, नूतन मुंबईकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी विविध मान्यवरांनी अनिल मुंबईकर यांचे कार्य,विचार व त्यांनी केलेला संघर्ष याविषयी माहिती दिली. अनिल मुंबईकर यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. एनएडीच्या विविध कामगार संघटना, वेश्वी ग्रामस्थ, मुंबईकर कुटुंबिय या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# कोकण पदवीधर निवडणुकीसाठी ॲड.सुशील गायकवाड इच्छुक

**। पाली । वार्ताहर ।**

कोकण पदवीधर निवडणूक घोषित झाल्याने विविध पक्षातील पदाधिकारी उमेदवारीसाठी इच्छुकांच्या रांगेत उभे असलेले पाहायला मिळत आहेत. यावेळी बहुजन विद्यार्थी संघटनेकडून देखील कोकण पदवीधरसाठी बहुजन विद्यार्थी संघटनेचे सुधागड तालुकाध्यक्ष ॲड.सुशील गायकवाड उमेदवारीसाठी इच्छुक असल्याचे व तसा सोशल मीडियाद्वारे प्रचार करीत असल्याचे दिसून येत आहे.



गेली अनेक वर्षे ॲड.सुशील गायकवाड हे विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे प्रश्न तडीस लावण्याचा प्रयत्न करीत आहेत. रायगड जिल्ह्यातील सुधागड, पेण, खोपोली, कर्जत, नागोठणे रोहा, अलिबाग, माणगाव, महाड अशा तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या कनिष्ठ महाविद्यालये, पॉलिटेक्निक्स इंजिनीअरिंगच्या कॉलेजमध्ये जाऊन विद्यार्थ्यांचे प्रश्न समजाऊन घेत ते मार्गी लावण्याचे काम सातत्याने करीत आहेत. तसेच इयत्ता ११वीत प्रवेशासाठी डोनेशन न घेता शासन नियमाप्रमाणेच विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला पाहिजे याकरिता त्यांनी अनेक आंदोलने केली आहेत. सुधागड तालुक्यात देखील प्रदेशाध्यक्ष अनिल वाणी व रायगड जिल्हाध्यक्ष संतोष गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली याविरोधात आमरण उपोषणाच्या माध्यमातून दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांना अकरावीत मोफत प्रवेश मिळवून दिला होता.

सुधागड तालुक्यात यावेळी तालुकाध्यक्ष ॲड. सुशील गायकवाड यांच्या नेतृत्वात कोकण पदवीधरसाठी शंभरहून अधिक नवमतदार नोंदणी करण्यात आली असून सबंध रायगड जिल्ह्यात बहुजन विद्यार्थी संघटनेचे हजारोच्या संखेने पदवीधर मतदार आहेत. ॲड.सुशील गायकवाड हे विद्यार्थी प्रश्नांबरोबरच सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) पक्षाचे रायगड जिल्हा युवा सचिव आहेत. त्यामुळे त्यांच्या पाठीशी मोठ्या प्रमाणावर बहुजन समाज आहे. रिपब्लिकन पार्टीचे युवक देखील त्यांना जोडले गेलेले आहेत.त्यामुळे रायगड जिल्ह्यात ते चांगला मताधिक्य घेतील हे मात्र निश्चित आहे.

सुशिक्षित बेरोजगारांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने त्यांच्यासाठीही संघटना काम करीत असून भविष्यात मोठ्या प्रमाणावर सुशिक्षित बेरोजगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी, सुशिक्षितांचा आवाज ॲड. सुशील गायकवाड यांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विधी मंडळात उठविला जाईल असा विश्वास व्यक्त करीत कोकण पदवीधर निवडणुकीसाठी बहुजन विद्यार्थी संघटनेकडून उमेदवारी मिळावी अशी इच्छा प्रदेशाध्यक्ष अनिल वाणी यांच्याकडे व्यक्त करणार असल्याचे ॲड.गायकवाड यांनी सांगितले.

## न्यू व्हिजन ज्युनिअर कॉलेज पेणचा निकाल शंभर टक्के

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण शहरातील नव्याने शैक्षणिक क्षेत्रामध्ये भरारी घेणाऱ्या न्यू. व्हिजन ज्युनिअर कॉलेज पेण या कनिष्ठ महाविद्यालयाचा यंदाचा एच.एस. सी. निकाल शंभर टक्के लागला असून यामध्ये वाणिज्य शाखेमधील हिमानी प्रशांत शहा ९२ टक्के, कु. खुशी किरण पाटील ९२ टक्के प्राप्त करून प्रथम आल्या. तसेच कु. ईश्वरी समीर मानकामे ९१.३३ टक्के द्वितीय तर कु. श्रुती राजेश म्हात्रे ९०.८३ टक्के तृतीय, शास्त्र शाखेचा निकाल शंभर टक्के लागला असून कु. विदिशा सचिन वैरागी ८६.५० टक्के ही प्रथम तर कु.श्रावणी प्रशांत तेलवने ८३.५० टक्के ही द्वितीय तर कु.चंदना महेंद्र घरत ८२.३३ टक्के व कु.पायल राजेंद्र कुमार टेमकर ८२.३३ टक्के तृतीय आली.

सदर महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळा तर्फे घेण्यात आलेल्या २०२४ च्या एच.एस.सी परीक्षेस न्यू. व्हिजन ज्युनिअर कॉलेज चे ८९ विदयार्थी परीक्षेस बसले होते. त्यातील सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शंभर टक्के निकाल लागला आहे.

# पोलादपूरमध्ये लक्झरी बसला अपघात

**। पोलादपूर । वार्ताहर ।**

पोलादपूर शहरातील अंडरपास आणि सर्व्हिसरोडच्या प्रवेशाठिकाणी अपघातांचे प्रमाण वाढत असून रविवारी पहाटे सव्वातीन वाजण्याच्या सुमारास एक सुस्साट व्हॉल्वो लक्झरी बस अंडरपासचा नॅशनल हायवे आणि पोलादपूरचा पूर्वेकडील सर्व्हिसरोड दरम्यानच्या काँक्रीट गटारावर चढल्याने पोलादपूरकरांची मोठ्या आवाजासह किंचाळण्याने झोपमोड झाली.




या घटनेवेळी लक्झरी बसमधील सर्व प्रवासी सुखरूप असल्याचे दिसून आले. मात्र, या आवाजामुळे पोलादपूरकर मात्र हवालदिल झाल्याचे दिसून आले.

मुंबईमधून आत्माराम ट्रॅव्हल्सची व्हॉल्वो लक्झरी बस (डीडी ०१ व्ही ९७४७) तळकोकणात गोव्याच्या दिशेने जात असताना रविवारी पहाटेच्या सुमारास पोलादपूर प्रभातनगर येथे आली असता हॉटेल गोल्डन पॅलेससमोरच्या सर्व्हिसरोड आणि महामार्गामधील काँक्रीटच्या गटार वजा फुटपाथवर तब्बल दीडशे फुट अंतरावर कर्णकर्कश आवाजासह चढली आणि या बसच्या डाव्या बाजूला मोठ्या प्रमाणवर नुकसान झाले. चालक जस्मीन सोहनी याचे व्हॉल्वो लक्झरी बसवरील नियंत्रण सुटल्याने ही बस प्रथम हायवे आणि सर्व्हिसरोडमधील रस्ता दुभाजकाला धडकली.

यानंतर व्हॉल्वो लक्झरी बस सुमारे १५० फुट अंतर दुभाजकाला घासत पुढे गेली. या घटनेमध्ये लक्झरी बसमधील २ चालकांसह ४९ प्रवासी सुदैवाने बचावले. यावेळी दुसरा चालक चांद रशीद शेख व्हॉल्वो चालक सोहनीच्या बाजूला बसला होता.

## मच्छीमारांना ओल्या जवळ्याचा आधार

**। मुरूड । वार्ताहर ।**

राजपुरी ते आगरदांडा खाडी मच्छीमारांसाठी एकेकाळी वरदान होती. परंतु दिघी पोर्ट व जंगल जेटीवरील वाहतूक वाढल्याने मासळी दुष्काळ पडल्याचे कोळी बांधवांचे म्हणणे आहे. १ जून ते ३१ जुलैपर्यंत मत्स्य प्रजनन काळ असल्याने मत्स्य विभागातर्फे खोल समुद्रात मासेमारी बंद ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. अशा वेळी खाडीतील मासेमारी अनेकांच्या उदरनिर्वाहाचे साधन ठरत आहे.


### जाहीर सुचना

सर्व लोंकाना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री विवेक ज्ञानेश्वर पाटील यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**बिनशेती मिळकतीचे वर्णन**

**मौजे मांडवणे, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील बिनशेती मिळकत सर्व्हे नं १६३/९ एकुण २०.०८ गुंठे जागा पैकी ०.१०.०४ विकत घेणार आहेत. तरी बिनशेती मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनाक ०३/०६/२०२४

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता.कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८



### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, श्री. बंडू बबन तुरडे, यांनी दिनांक १७ जानेवारी २०२४ रोजीच्या साठेखताने आणि कुळअखत्यारपत्राने जमीन मालक श्री.शिवाजी सखाराम गायकवाड, यांचेकडून त्यांचे अविभाज्य हिस्स्याचे क्षेत्र ०.१२.०० हे.आर.पॉ. म्हणजेच १२ गुंठे इतके क्षेत्र विकत घेतलेले आहे. सदरील हेच क्षेत्र श्री. बंडू बबन तुरडे यांनी आमचे अशील १.श्री.सुर्यकांत रमेश शिंदे. आणि २. श्री. चंद्रकांत रमेश शिंदे, यांना विकत देणेचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**-: मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे, माणगाव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड**

| गाव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| माणगाव तर्फे वासरे | ९/१ | ०.२४.०० या एकूण क्षेत्रापैकी श्री.शिवाजी सखाराम गायकवाड, यांचे अविभाज्य हिस्स्यातील त्यांनी विकत दिलेले ०.१२.०० हे.आर.पॉ. म्हणजेच १२ गुंठे इतके क्षेत्र | ०.९२ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही, व कसल्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, १४ (चौदा) दिवसांचे आत, खालील सही करणार ॲडव्होकेट, यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, खरेदीखत करुन पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत दि. ०३/०६/२०२४

कळावे

**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री.साई सावली, सो. लि., रूम नं.१०,
दुसरा माळा कर्जत दिवाणी कोर्टासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८


पान १ वरुन

## भाजपच्या हाती ‘भोपळा’

म्हणून आम्ही जिंकलो आहे. चामलिंग २०१९ लाच हरले होते. परंतु, ही लोकशाही आहे. त्यामुळे त्यांनी २०२४ लाही निवडून लढवली. गेल्या २५ वर्षांत त्यांनी जे केलं नाही ते आम्ही ५ वर्षांत केलं. म्हणूनच त्यांचा पराजय झाला.

दरम्यान, एसडीएफला केवळ शायरी मतदारसंघातून विजय मिळवता आला आहे. माजी मुख्यमंत्री आणि एसडीएफ अध्यक्ष पवन कुमार चामलिंग हे उमेदवार भोज राज राय यांच्याकडून ३ हजार ६३ मतांच्या फरकाने हरले. गेल्या निवडणुकीत एसकेएम पक्षाने १७ जागा तर, एसडीएफने १५ जागांवर विजय मिळवला होता. यंदा तर, एसकेएमने स्वतःचाच विक्रम मोडीत काढत एसडीएफला धूळ चारली आहे. सिक्कीमचे पाच वेळा मुख्यमंत्री राहिलेले एसडीएफचे प्रमुख पवन कुमार चामलिंग यांचा पोकलोक कामरंग आणि नामचेबुंग विधानसभा मतदारसंघातून पराभव झाला आहे. आठ वेळा आमदार राहिलेले चामलिंग हे त्यांच्या मूळ नामची जिल्ह्यातील पोकलोक कामरंग जागेवर सिक्कीम क्रांतीकारी मोर्चाच्या भोज राज राय यांच्याकडून तीन हजार ६३ मतांनी पराभूत झाले. राय यांना ८ हजार ३७ मेत मिळाली तर, चामलिंग यांना ४ हजार ९७४ मते मिळाली. चामलिंग हे १९९४ ते २०१९ पर्यंत २५ वर्षे सिक्कीमचे मुख्यमंत्री होते. सिक्कीम भाजपाचे अध्यक्ष दिल्ली राम थापा यांना अप्पर बुर्टुक विधानसभा मतदारसंघातून उमेदवार कला राय यांच्याकडून पराभव पत्करावा लागला. थापा हे राय यांच्याकडून २ हजार ९६८ मतांनी पराभूत झाले.

## अजूनही शुद्ध पाण्याच्या प्रतिक्षेत

नदीतून कोणतीही शुद्धीकरण प्रक्रिया न करता पाणीपुरवठा केला जातो. इतरही गावातील लोक अंबा नदीचे पाणी वापरतात. सांडपाणी, कंपन्यांमधील प्रदूषित पाणी, घाण व कचरा, वाळूउपसा यामुळे येथील नागरिक व जीवसृष्टीचे आरोग्य धोक्यात आले आहे. याशिवाय नदीच्या पाण्यात सध्या मोठ्या प्रमाणात हिरवळ तयार झाली आहे. सुधागड तालुक्यात पाली, राबगाव, आंबोले, रासळ, कानसळ, हेदवली, जांभुळपाडा या गावाजवळ अंबा नदीच्या काठावर अनेक कंपन्या, फार्महाऊस, निवासी संकुल उभे राहिले आहेत. कंपन्यातील दूषित रसायनयुक्त पाणी आणि सांडपाणी थेट अंबा नदीच्या पात्रात सोडण्यात येते. तसेच नदीतून वाहून आलेले प्रदूषित व सांडपाणी पुढे वाहून न जाता येथेच साठून राहते. तसेच रसायन व सांडपाण्याबरोबरच कचरा आणि घाणदेखील साठते. नदीवर महिला धुणीभांडी करतात. याबरोबरच नदीत टाकलेले निर्माल्य कुजल्यानेदेखील पाणी खराब होते. परिणामी, ते अधिक दूषित झाले आहे. पाण्याला उग्र स्वरुपाची दुर्गंध येते, चवही खराब लागते. पाणी प्रदूषित झाल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. यामुळे अंबा नदीच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांचे जनजीवन धोक्यात आले आहे.

दूषित पाणी हे पिण्यायोग्य नसल्याने लोक, जनावरे यांच्या प्रकृतीवर प्रतिकूल परिणाम होत आहे. वाकण-पाली-खोपोली राज्य महामार्गावरील अंबा नदीच्या नवीन पुलाचे काम सुरू असल्याने अंबा नदीचे पाणी मोठ्या प्रमाणात गढूळ व दूषित होत आहे. त्यामुळे काही दिवसांपासून पालीकरांना गढूळ पाण्याचा पुरवठा होत आहे. जॅकवेलजवळच पुलाचे काम सुरू असल्याने तेथील नदीपात्रात चिखल, माती, राडारोडा व सिमेंट मिसळून पाणी खराब होत आहे. शिवाय, पाण्याचा रंगदेखील बदलत असल्याची परिस्थिती वारंवार पहावयास मिळते. अशातच पालीकरांना पिण्याचे शुद्ध पाणी कधी मिळणार, हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात आहे.

## मान्सून येताच बोटी विसावल्या

रायगड जिल्ह्यामध्ये पाच हजारांहून अधिक मासेमारीच्या नौका आहेत. त्यामध्ये काही नौका यांत्रिकी, तर काही बिगर यांत्रिकी आहेत. ३१ मे हा मासेमारी हंगामचा शेवटचा दिवस होता. १ जूनपासून पुढील दोन महिने बोटी किनाऱ्यावर असणार आहेत. त्यानंतर ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यापासून पुन्हा एकदा मासेमारीच्या नव्या हंगामाला सुरुवात होणार आहे. तब्बल दहा महिने मासेमारी व्यवसाय चालतो. मासेमारीतून मच्छिमार आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतात. अलिबाग, आक्षी, बोर्ली, रेवदंडा, नवगाव आदी बंदरांवर मासळीचा मोठ्या प्रमाणात लिलाव होतो. त्यातून कोट्यवधींची उलाढाल होते. परंतु, अनेकवेळा बदलते हवामान, सांडपाण्यांमुळे समुद्रात निर्माण होणारे प्रदूषण, जेली फिश अशा अनेक समस्यांमुळे मासेमारीवर परिणाम होतो. त्यामुळे मासळीच्या उत्पादनात घट होते. तरीदेखील जिल्ह्यातील मच्छिमार सर्व संकटांवर मात करीत मासेमारीचा व्यवसाय करीत आहेत. जून महिन्यात पावसामुळे उधाणाबरोबरच वारा, वादळ मोठ्या प्रमाणात येते. मासेमारीसाठी गेलेल्या बोटी अडकून पडण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे अनेकांना जीवदेखील गमवावा लागतो. तसेच पावसाळ्यात मासळी प्रजोत्पादन कालावधी असतो. त्यामुळे दोन महिने मासेमारीवर शासनाकडून बंदी घातली जाते. त्यामुळे खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे. मासेमारी बंदीमुळे मच्छिमारांनी नौका किनारी लावण्यास सुरुवात केली आहे. जिल्ह्यातील काही बंदरांवर बोटी नांगरण्यात आल्या असून, काही ठिकाणी काम सुरू आहे.

## पाण्यामुळे शेतीचे नुकसान

## भातबियाणे खरेदीची लगबग

पुरवठा जिल्ह्याला झाला आहे. आठ दिवसांमध्ये मागणीनुसार बियाणांसह खतांचा पुरवठा होणार असल्याची माहिती जिल्हा परिषद कृषी विभागाकडून देण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यामध्ये १९६ भात बियाणे विक्री केंद्र व २९० खत विक्री केंद्र आहेत. या विक्री केंद्रामध्ये गेल्या अनेक दिवसांपासून बियाणे व खत विक्रीला सुरुवात झाली असून, आतापर्यंत दहा टक्के बियाणांची विक्री झाल्याची माहिती देण्यात आली आहे.

**विक्रेत्यांवर भरारी पथकाची नजर**

जिल्ह्यामध्ये भात विक्रीबरोबरच खत विक्री केंद्र सुरु केले आहेत. या केंद्रातून बियाणे खरेदीला सुरुवात झाली आहे. मान्यताप्राप्त दुकानांमधून शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहेत. त्यानुसार शेतकरी विक्री केंद्रातून बियाणे खरेदी करीत आहेत. मात्र, शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या विक्री केंद्रावर १७ भरारी पथकाची नजर राहणार आहे. त्यात तालुका स्तरावर १५ व जिल्हा स्तरावर दोन भरारी पथकांचा समावेश आहे. पावती न देणे, किंमत अधिक घेणाऱ्या विक्रेत्यांवर या पथकामार्फत कारवाई केली जाणार आहे.

**मान्यता नसलेल्या दुकानांवर होणार कारवाई**

रायगड जिल्ह्यामध्ये भात बियाणे, खत खरेदीला सुरुवात झाली आहे. खत, बियाणे खरेदीसाठी मान्यता प्राप्त विक्री केंद्र सुरु केले आहेत. मात्र काही किराणा दुकान व अन्य दुकानांमधून राजरोसपणे खत विक्री केले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांकडून आर्थिक लूट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच भरारी पथकामार्फत मान्यता नसलेल्या दुकानांवरदेखील कारवाई केली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

निवडक

## वन वे फलकाची दुरवस्था

**नेरळ :** नेरळ गावातील काही रस्ते वाहतूक नियोजन करण्यासाठी वन वे करण्यात आले आहेत. त्याबाबत सूचना देणारे फलक नेरळ पोलीस ठाणे यांच्याकडून काही रस्त्यांवर लावण्यात आले आहेत. नेरळ गावातून कळंब कशेले रस्त्याने जाणारे वाहन चालक यांना वाहतूक कोंडीमध्ये अडकून पडावे लागू नये यासाठी हे वाहतूक नियोजन नेरळ पोलीस ठाणे यांनी केले आहे. मात्र, त्यातील जीवा महाले चौकातील वन वे अशी माहिती देणारा फलक फाटला आहे. त्यामुळे बाहेरील वाहने हे त्या भागातून थेट रस्ता मोकळा दिसला की पुढे जातात.

## दुचाकींचा अपघात

**पेण :** वडखळ येथील पांडापुर गावाजवळ मुंबई-गोवा महामार्गावर दुचाकी (एमएच-०६-सीएफ-२३२४) चालक रस्त्याच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करून हयगयीने भरधाव वेगात चालवुन समोरून येत असलेल्या युनिकॉर्न (एमएच-०६-बीएक्स-५१२१) या दुचाकीला धडक दिली. या अपघातात दोघेही गंभीर जखमी झाले असेन दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे. याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सफौ राजेंद्र म्हात्रे हे करीत आहेत.

## महिलेच्या दागिन्यांची चोरी

**खोपोली :** एक महिला वाई ते मुंबई असा एस.टी.मधून प्रवास करीत होती. यावेळी खोपोली येथील फुडमॉल येथे एस.टी.थांबली असता त्या महिलेच्या पर्समध्ये ठेवलेल्या एकूण १,५१,०००/- रुपये किंमतीच्या सोन्याच्या दागिन्यांची प्लॅस्टीकची डब्बीची चोरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे निदर्शनास आले. याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई अलोक खिस्मतराव हे करीत आहेत.

## चॅम्पियन मुदत ठेव योजना

**श्रीवर्धन :** बँक ऑफ इंडियाने ६६६ दिवस चॅम्पियन मुदत ठेव योजना ग्राहकांच्या सेवेत सादर केली आहे. या योजने अंतर्गत २ कोटी पेक्षा कमी रकमेसाठी अति जेष्ठ नागरिकांना ७.९५% प्रतिवर्ष व्याज मिळेल. त्याचबरोबर जेष्ठ नागरीकांना ७.८०% प्रतिवर्ष व अन्य ग्राहकांना ७.३०% प्रतिवर्ष व्याज मिळेल. ग्राहक बँक शाखेतुन, इंटरनेट बैंकिंग आणि बीओआई मोबाइल या एप्लिकेशन द्वारा योजनेचा लाभ घेऊ शकतात . योजने अंतर्गत ठेवीवर कर्ज सुविधा आणि मुदतपूर्व बंद करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

## झाडे तोडण्याची मागणी

**आगरदंडा :** मुरुड शहरात पर्यटकांची ओघ दिवसांनदिवस वाढत आहे. या ठिकाणी पर्यटक व स्थानिक नागरिक समुद्रकिनारी ये-जा करित असतात. समुद्रकिनाऱ्यालगत असणाऱ्या सुरूची झाडे सुशोभीकरणाच्या खोदकामामुळे कमकुवत होऊन पडलेल्या अवस्थेत आहेत. या झाडांपासुन नागरिकांना धोका निर्माण होऊ शकतो. तरी नगरपरिषदेने तात्काळ लक्ष देऊन त्वरित हे झाड तोडून पर्यटकांना व सामाजिक दिलासा द्यावा, अशी मागणी अरविंद गायकर यांनी नगरपरिषदेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# वाहतूक कोंडीचा फटका




## ढवर-बेलकडे-अलिबाग रस्त्यावर वाहतूक कोंडी

- दोन कि.मी.पर्यंत वाहनांच्या रांगा
- वाहतूक पोलीस नसल्याने पर्यटकांनी व्यक्त केली नाराजी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

उन्हाळी सुट्टीचा आनंद घेऊन पर्यटक रविवारी दुपारपासून परतीच्या मार्गावर निघाले. यावेळी अलिबाग-रोहा मार्गावरील तसेच अलिबाग-रेवदंडा मार्गावरील नागावपासून बेलकडे फाटा ते कुरुळपर्यंत वाहतूक कोंडीचा फटका पर्यटकांना बसला. दोन ते तीन किलोमीटर अंतरावर वाहनांच्या रांगाच रांगा दिसून आल्या होत्या. दरम्यान, या मार्गावर एकही वाहतूक पोलीस दिसून आला नसल्याने पर्यटकांनी नाराजी व्यक्त केली. वाहतूक कोंडीमुळे पर्यटकांची आपले घर गाठताना दमछाक उडाली

मे महिना संपून जून महिना उजाडला आहे. जूनच्या दुसऱ्या आठवड्यापासून शाळा, महाविद्यालये सुरु होणार आहेत. त्यामुळे शाळेच्या खरेदीची लगबग सुरू झाली असून पर्यटकांनी रविवारी (दि.२) त्यांच्या परतीच्या मार्गावर जाण्याची तयारी केली. यावेळी काही पर्यटक सकाळी निघाले, तर काही पर्यटक दुपारी भोजन करून निघाले. काही पर्यटकांनी खासगी वाहनांतून जाणे पसंत केले. तर, काही पर्यटकांनी एसटी बसमधून जाण्याला पसंती दर्शविली. यामुळे मुंबई व पुणे जाण्यासाठी पर्यटकांची अलिबाग एसटी बस स्थानकात गर्दी दिसून आली. यातच जलवाहतूक बंद असल्याने एसटीवर प्रवाशांचा भार पडला. अपूरे कर्मचारी असतानादेखील पनवेलपर्यंत विना थांबा ज्यादा बसेसची व्यवस्था आगार व्यवस्थापक अजय वनारसे यांच्या मार्गदर्शनानुसार करण्यात आली.

तसेच, खासगी वाहनाने परतीच्या मार्गावर निघालेल्या पर्यटकांना वाहतूक कोंडीचा मोठा फटका बसला. अलिबाग-रोहा मार्गावरील ढवर ते कुरुळ या तीन किलोमीटर अंतरापर्यंत वाहतूक कोंडी झाली होती. त्यामुळे वाहनांचा वेग मंदावला होता. अनेक वाहने संथ गतीने धावत होती. दुपारच्या दरम्यान वाहतूक कोंडी झाल्याने प्रवाशांसह पर्यटकदेखील त्रस्त झाले. दरम्यान, या कालावधीत एकही वाहतूक पोलीस नसल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली.

## माधवी कुलकर्णी सेवानिवृत्त

**। अलिबाग । वार्ताहर ।**

३६ वर्षाच्या अखंड विद्यादानाच्या पवित्र कार्यातुन माधवी राजन कुलकर्णी आरसीएफ स्कूलमधून सेवानिवृत्त झाल्या आहेत. आपल्या कार्यकाळामध्ये त्यांनी वारणा महाविद्यालय वाणानगर, जेएसएम कॉलेज अलिबाग, एसआरटी ज्युनिअर कॉलेज रेवदंडा व त्यांनतर अखेर आरसीएफ स्कूल येथे काम केले आहे. जीवशास्त्र विषयातील ख्यातनाम शिक्षिका म्हणून त्या प्रसिद्ध आहेत. विद्यादानाबरोबरच अनेक विद्यार्थ्यांना तालुका, जिल्हा, राज्य व देश पातळीवर विज्ञान प्रदर्शनाम ध्ये प्रकल्प मार्गदर्शक म्हणून काम केले आहे. विज्ञान प्रदर्शनामध्ये परिक्षक, मार्गदर्शक म्हणून त्यांनी उल्लेखनिक कार्य केले आहे. त्यांचे अनेक विद्यार्थी डॉक्टर, संशोधक, सैनिक अधिकारी, पत्रकार म्हणून जगभर काम करत आहेत.





## वडाळे तलाव परिसरात बत्ती गुल

**। पनवेल । वार्ताहर ।**

शनिवारी (दि.१) दुपारी तीन वाजल्यापासून वडाळे तलाव परिसरात वीज पुरवठा खंडित झाला होता. त्यामुळे संध्याकाळी सहा वाजल्यानंतर रोज झगमगणारा वडाळे तलाव परिसर अंधारात बुडून गेला होता. यावेळी चंद्रशेखर सोमण यांनी त्वरित महावितरणच्या अधिकाऱ्यांना संपर्क केला असता सहाय्यक अभियंता किशोर पाटील हे त्वरित आपला लाईनमनच्या स्टाफसह जागेवर उपस्थित झाले.

तिथे उपस्थित महावितरणचे कर्मचारी सानप, राठोड व मते यांनी युद्ध पातळीवर कामाला सुरुवात करत दीड तासाच्या अथक परिश्रमानंतर नवीन डीओ ट्रान्सफॉर्मरमध्ये बसवून वडाळे तलाव व आसपास परिसरातील विद्युत पुरवठा सुरळीत केला.

## गुरांनी घेतला सावलीचा आधार

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात वाढत्या तापमानामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. नागरिकांबरोबरच गुरांनादेखील त्याचा त्रास जाणवू लागला आहे. त्यामुळे अनेक गुरे उन्हापासून बचाव करण्यासाठी भर दुपारी सावलीचा आधार घेत असल्याचे दिसून येत आहे.



जिल्ह्यामध्ये उन्हाचा तडाखा प्रचंड वाढू लागला आहे. ३६ अंश सेल्सिअसवरून ४० अंश सेल्सिअस इतके तापमान वाढत आहे. सकाळी दहा वाजल्यापासून उन्हाचे चटके बसत आहेत. त्यामुळे उन्हात जाणेदेखील अनेकजण टाळत आहेत. नागरिकांबरोबरच ग्रामीण भागात असलेल्या गाय, बैल सारख्या गुरांनादेखील उन्हाचा फटका बसत आहे. गुरे सावलीच्या शोधात आहेत. ज्या ठिकाणी झाडाची सावली मिळेल त्याठिकाणी बसून दुपारी गुरे सावलीचा आधार घेत आहेत. अनेक वेळा रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांजवळ अथवा, मोकळ्या जागेमध्ये जंगलभागात असलेल्या झाडांजवळ एकजूटीने गुरे सावलीचा आधार घेताना दिसून येत आहेत.



● नागाव समुद्रकिनारी वाहन आणण्यास स्थानिक प्रशासनाने बंदी घातली आहे. तरीही काही अति उत्साही पर्यटक मात्र जोशात समुद्रात वाळूमध्ये वाहने टाकत आहेत.

## वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

महानगरपालिकेचे शेकापचे माजी नगरसेवक शंकर म्हात्रे यांचा वाढदिवस रविवारी (दि.२) विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. यावेळी दहावी आणि बारावी परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी आ. बाळाराम पाटील यांनी सांगितले की, शंकर म्हात्रे हे नेहमीच शेकाप बरोबर एकनिष्ठ आहेत. नुकतेच ते मोठ्या आजारातून बरे झाले आहेत आणि पुन्हा जोमाने कामाला लागले आहेत. याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. यावेळी विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील, पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, नारायण घरत, गोपाळ भगत, रवींद्र भगत, गौरव पोरवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

## सद्भाव फाऊंडेशन तर्फे सायकल वाटप

**। कर्जत । वार्ताहर ।**

सद्भाव फाउंडेशन मुंबई शाखा कर्जत यांच्या सौजन्याने ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणाकरिता प्रवास साधन म्हणून मोफत सायकलीचे वाटप करण्यात आले.

सद्भाव फाउंडेशन एक सामाजिक संस्था असून कर्जत व खालापूर ग्रामीण भागातील लोकांचा आर्थिक व सामाजिक विकास करण्यासाठी संस्था नेहमी प्रयत्न करत असते. ग्रामीण भागातील मुली शिक्षणाकरीता तीन ते चार किलोमीटर अंतरावरून चालत येत असतात, अशा गरजू मुलींना संस्थेतर्फे मोफत ७७ सायकलींचे वाटप करण्यात आले. संस्थेच्या ट्रस्टी निता जोशी यांच्या सहकार्याने आणि मार्गदर्शनाखाली



संस्थेचे कर्मचारी प्रवीण पाटील, प्रगती पाटील, संतोष ढाकवळ, प्रकल्प अधिकारी सुनंदा लाड यांनी वाटप केले.

## मंगळवारी वरसोलीत रक्तदान शिबीर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शेकापचे एकनिष्ठ कार्यकर्ते, वरसोली ग्रामपंचायतीचे सदस्य सुरेश रामदास घरत यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी (दि.४) रोजी सकाळी नऊ ते सायंकाळी चार या वेळेत वरसोली येथील कोळीवाड्यामधील खंडोबा मंदिर येथे शिबीर घेतले जाणार आहे. रक्तबंध सामाजिक संस्था अलिबाग- महाराष्ट्र आयोजित रक्तदान शिबीराला मोठ्या संख्येने सहभागी होण्याबरोबरच अधिक माहितीसाठी सिध्दांत कोळी ८६०५६७३७८१, हितेश भिवे ८४१२०७७५०३, प्रज्ञेश झिटे ८६९८१५०२४१ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## तीस वर्षातील खड्ड्यांच्या त्रासातून सुटका

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

खालापुर तालुक्यातील अनेक ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था खड्ड्यात रस्ता की, रस्त्यात खड्डा अशी असून या खड्ड्यांमुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. असाच त्रास माणकिवली ग्रामपंचायत हद्दीतील माणकिवली-शेणगाव परीसरामधील प्रवासी व रहिवाशांना करावा लागत होता. परंतु, आता रस्त्याच्या कामाला वेग आल्याने रहिवाशांना चांगल्या रस्त्यावरुन प्रवास करता येणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून येथील मुख्य रस्ता खड्ड्याच्या विळख्यात सापडल्याने अनेक जण खड्ड्याच्या त्रासाला अक्षरशः कंटाळले होते. आता हा खड्डेमय रस्ता काँक्रिटीकरण झाल्याने पुढील काळात येथील प्रवाशांचा प्रवास सुखकर होणार असून काँक्रिटीकरण काम अत्यंत चांगल्या दर्जाचे होत असल्याने अनेक जण समाधान व्यक्त करत आहेत.




> माणकिवली रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या कामाने वेग घेतल्याने पुढील काळात माणकिवलीसह शेणगाव परिसरातील ग्रामस्थांसह प्रवाशांचा येथून प्रवास सुखकर होणार असून अनेक वर्ष खड्ड्यातून होणारा प्रवास आता खड्डे मुक्त होणार आहे. त्यामुळे सर्वजण समाधान व्यक्त करत आहेत.
>
> – चंदन भारती, माजी सरपंच तथा विद्यमान सदस्य

> आमच्या गावचा मुख्य रस्ता गेल्या अनेक वर्षापासून खड्ड्याच्या विळख्यात सापडला होता. त्यामुळे इथून प्रवास करणे आम्हाला जिकरीचे बनले होते. आता या रस्त्याचे काँक्रीट करण्याचे काम सुरू आहे. तर, काही अंतराचे काँक्रिटीकरणाचे काम पूर्णत्वास गेल्याने समाधान व्यक्त करत आहोत. हे काम उत्तम दर्जाचे व्हावे यासाठी आम्ही वेळोवेळी दक्षता घेत आहोत.
>
> – विष्णू ठोंबरे, माणकिवली ग्रामस्थ

### जिल्हाधिकाऱ्यांनी केली मतमोजणी केंद्राची पाहणी

## मंगळवारी सकाळी मतमोजणीला सुरुवात

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड लोकसभा मतदार संघातील मतमोजणी मंगळवारी (दि.४) सकाळी आठ वाजल्यापासून सुरु होणार आहे. त्यानिमित्ताने नेहुली येथील जिल्हा क्रिडा संकुलातील मतमोजणी केंद्राची पाहणी शुक्रवारी केली. यावेळी त्यांनी तेथील सोयी सुविधांची माहिती घेऊन संबंधितांना काही सुचनाही केल्या.




यावेळी रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, महेश पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जे.ई. सुखदेवे यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मतमोजणी शांततेत व सुरळीत पार पाडावी यासाठी केंद्रामध्ये उभारण्यात आलेले वेगवेगळे कक्ष, सोयीसुविधांची उभारणी, उमेदवारांसाठी व्यवस्था, माध्यम कक्ष, मतमोजणी पथके यांची पाहणी केली. तसेच, केलेल्या तयारीचा आढावा घेतला.

मतमोजणी केंद्राच्या परिसरात गर्दी होऊ नये यासाठी वाहन तळांचीदेखील व्यवस्था केली आहे. त्यानुसार वाहनतळांची जागा निश्चिती, वाहतूक वळविण्याबाबत चर्चा करण्यात आली. मतमोजणीच्यादरम्यान कोणताही त्रास होणार नाही. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही या दृष्टीने खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी सुरक्षेबाबतही पाहणी करीत त्यावर चर्चा करण्यात आली. मतमोजणी शांततेत आणि निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पार पडेल याची दक्षता घ्यावी, आवश्यक सुविधांची तातडीने व्यवस्था करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी यावेळी दिल्या.

## त्रिवेणी क्लिनिक सेंटरचे उद्घाटन

**। पेण । प्रतिनिधी ।**

डॉ. भक्ती संगम पाटील यांच्या त्रिवेणी आयुर्वेदिक क्लिनिक आणि पंचकर्मा सेंटरचे उद्घाटन ॲड. बापूसाहेब नेने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. भक्ती पाटील यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले की, आमच्या या सेंटर मध्ये आयुर्वेदोक्त रूग्ण परिक्षण करून संपूर्ण आयुर्वेदिक निदान व ग्रंथोक्त औषधांचा वापर करून चिकित्सा केली जाईल. तसेच, रुग्ण व्याधी व प्रकृती परीक्षण करून पंचकर्म चिकित्सा केली जाईल. खूप काळा पासून व्याधीने त्रस्त असलेले रूग्ण व जुने व्याधी यांची योग्य माहीती व सल्ला दिला जाईल.

## पनवेलच्या ग्रामपंचायतीकडे घंटागाडीच नाही

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल तालुक्यातील १७ ग्रामपंचायतीकडे कचऱ्यासाठी घंटागाडीत नसल्याचे उघडकिस आले आहे. त्यामुळे रस्त्यावर आणि अन्यत्र कचरा अस्ताव्यस्त पडलेला दिसून येत आहे.

पनवेल तालुक्यात एकूण ७१ ग्रामपंचायती आहेत. यातील १७ ग्रामपंचायतीकडे घंटागाडीच नाही. येथील ग्रामपंचायतींची आर्थिक परिस्थिती नसल्याने घंटागाडी घेता येत नाही. परिणामी येथे कचरा वाढू लागलेला आहे. पनवेल तालुक्यात डम्पिंग ग्राउंड नसल्याने कचऱ्याची समस्या दिवसेंदिवस वाढू लागलेली आहे. कचरा कुठेही आणि कसाही रस्त्यावर, मोकळ्या जागेत फेकला जातो. त्यामुळे दुर्गंधी पसरत आहे. शिवाय मच्छरांचे प्रमाण देखील वाढले आहे. यामुळे पनवेलमध्ये कचऱ्याच्या समस्याने उग्ररूप धारण केलेले आहे. गावांमध्ये जाताना रस्त्यावर प्रचंड कचरा साचलेला दिसून येतो. येथील प्रत्येक गावाची परिस्थिती वेगळी नाही. येथील लोकसंख्या झपाट्याने वाढत असल्याने व रहिवासी संख्या वाढत असल्याने कचऱ्याची समस्या देखील बिकट होत चालली आहे. यातील एका ग्रामपंचायतने सात ते आठ लाख रुपये खर्च करून काही वर्षांपूर्वी घंटागाडी घेतली. मात्र, या घंटागाडीचा अद्याप उपयोग झालेला नाही. ती गंजू लागली आहे.

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)


# निकालांआधीचे निकाल

लोकसभा निवडणुकीचे निकाल मंगळवारी येणार आहेत. पण विविध टीव्ही वाहिन्या आणि सर्वेक्षण करणाऱ्या संस्थांनी शनिवारीच हा निकाल लावून टाकला आहे. एक्झिट पोल नावाच्या या प्रकारात नरेंद्र मोदी पुन्हा बहुमताने सत्तेत येणार असे म्हटले आहे. एक्झिट पोल हा अमेरिकेत उगम पावलेला प्रकार आहे. तेथे आपल्या प्रकारची संसदीय लोकशाही नाही. अमेरिकेचा अध्यक्ष खासदारांमधून नव्हे तर थेट जनतेतून निवडला जातो. शिवाय गेली सुमारे दोनशे वर्षे तेथे केवळ दोनच पक्ष आहेत. डेमॉक्रॅटिक आणि रिपब्लिकन. अध्यक्षपदासाठी या दोनच पक्षांच्या नेत्यांमध्ये चुरस असते. मतदार त्यांच्यापैकी एकाची निवड करतात. अनेक राज्ये ही एक तर डेमॉक्रॅटिक किंवा रिपब्लिकन यांची बांधिलकी मानणारी आहेत. त्यामुळे तेथे मतदान कोणाला होणार हे उघड असते. कुंपणावर असलेले किंवा ज्यांचा निर्णय झालेला नाही असे मतदारच निर्णायक ठरतात. त्यामुळे त्यांच्यामध्ये हे सर्वेक्षण करणे महत्वाचे ठरते. तेथे मतदानकेंद्रांमधून बाहेर येताना मतदारांना त्यांनी कोणाला कौल दिला हे विचारले जाते. तेथे लोक सहजपणे व प्रामाणिकपणे आपले मतदान उघड करतात. त्यांच्या आधारे एकूण मते कशी पडतील याचा अंदाज केला जातो व तो बराचसा अचूक असतो. अमेरिकेत सतत शेकडो प्रकारची सर्वेक्षणे होत असतात. यातील बरीचशी फोनवरूनही होतात. मात्र त्यात लोक प्रामाणिकपणे उत्तरे देतात. सुट्टीत फिरायला कोठे जायला आवडेल यापासून तो तुम्ही आपल्या आईवडिलांना वर्षातून किती वेळा भेटता यापर्यंत वाटेल ती माहिती त्यात गोळा केली जाते. तिच्या आधारे कंपन्या आपले मार्केटिंग धोरण ठरवतात. अशा सर्वेक्षणांमध्ये दोन गोष्टी महत्वाच्या असतात. एक म्हणजे सँपल साईज अधिकात अधिक ठेवणे आणि लोकांनी खरीखुरी उत्तरे देणे. या दोन्ही गोष्टी तेथे रुजलेल्या आहेत. किंबहुना, या सर्वेक्षणांचे एक शास्त्रच तिथे विकसित झालेले असून हे सर्व आपल्या उपयोगाचे आहे याबाबत लोकांचीही खात्री असते.

### सोपे नाही

मुद्दा असा की एक्झिट पोल हे तंत्र अमेरिकी परिस्थितीत विकसित झालेले आहे. ते भारतात लागू करण्यात अनेक अडचणी आहेत. आपण कोणाला मत दिले हे भारतीय मतदार सहजासहजी सांगणार नाहीत. त्यांच्यावर गावातल्या गटांचे, वरिष्ठ किंवा बलिष्ठ जातींचे, दांडग्या लोकांचे दबाव असतात. तुम्ही मत दिले नाहीत तर तुम्हाला निधी मिळणार नाही असे अजित पवारांसारखे मंत्री अलिकडपर्यंत उघडपणे धमकावत होते. दादा ते खरे करून दाखवतील यात शंका नाही. असे अनेक दादा भारतभरात गावोगाव आढळतात. या स्थितीत आपण कोणाला मत दिले हे कळू नये याचीच काळजी मतदारांनी घेतली तर ते समजण्यासारखे आहे. तरीही आपल्याकडे अशी विचारणा करून एक्झिट पोल केल्याचे दावे केले जातात. पण हे आकडे निर्विवाद भरवशाचे नसतात. त्यामुळे मग या सर्वेक्षण कंपन्या राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्ते यांच्याशी बोलून व इतर रीतीने कानोसा घेण्याचा प्रयत्न करतात. आपल्यासमोर एक्झिट पोल म्हणून जे आकडे समोर येतात ते या अनेक प्रकारच्या सर्वेक्षणांची गोळाबेरीज असते. अनेकदा अंतिम निकाल खरोखरच या आकड्यांच्या जवळपास लागतात. काही वेळेला हे आकडे सपाटून चुकतात. जसे की अलिकडे छत्तीसगड व राजस्थानच्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस विजयी होईल असा अंदाज अनेक सर्वेक्षणांनी केला होता. पण तो चुकला. बंगालमध्येही असे अंदाज फोल ठरले होते. अलिकडच्या काळात लोकसभेचे आकडे पूर्णतः उलटेपालटे झाले असल्याचा अनुभव नाही. त्यामुळे यंदाचे आकडेही बरोबर येतील असा दावा या कंपन्या नक्कीच करू शकतात. मात्र यंदाची निवडणूक ही चुरशीची होती. महाराष्ट्र किंवा बिहारमधील राजकीय समीकरणे पार बदलून गेली होती. नीतीश किंवा अजितदादा हे अचानक भाजपसोबत गेले होते. त्यामुळे भाकिते वर्तवणे सोपे नव्हते.

### विरोधकांचे ऐक्य

शनिवारी जारी केलेल्या बहुतेक सर्वेक्षणांनी मोदींच्या भाजपला तसेच राष्ट्रीय लोकशाही आघाडीला विक्रमी जागा आणि बहुमत दिले आहे. नरेंद्र मोदी यांनी निवडणुकीत चारशे पारचा नारा दिला होता. ते होणे सोपे दिसत नसले तरी इंडिया आघाडी बरीच मागे राहील असा या सर्वेक्षणांचा सारांश आहे. महाराष्ट्रात महाविकास आघाडीला किमान सतरा ते कमाल २८ जागा दाखवण्यात आल्या आहेत. एकूण भाजप-शिंदे व दादा यांच्या गटाला किमान दहा ते कमाल २१ जागांचा फटका बसेल असा याचा अर्थ आहे. गेल्या वर्षभरापासून अशाच प्रकारचे अंदाज विविध सर्वेक्षणांमधून दिसले आहेत. भाजपला शिक्षा करण्याचा जनतेचा तोच मूड अजूनही कायम आहे हे या सर्वेक्षणांवरून स्पष्ट होते. दिल्लीत शनिवारी इंडिया आघाडीच्या नेत्यांची एकत्रित बैठक झाली. त्यांनी आपल्याला २९५ जागा मिळतील असा दावा केला. काही जणांना हा अतिरंजीत वाटू शकेल. पण हे सर्व नेते गेले दोन महिने राज्याराज्यांमध्ये प्रचार करून आले आहेत. त्यांच्या अंदाजांना जमिनीवरच्या संपर्काचा थेट आधार आहे. त्यामुळे चार तारखेची वाट पाहणे हे अधिक इष्ट राहील. मात्र शनिवारच्या बैठकीमुळे विरोधकांमधील ऐक्य अधिक बळकट झाले असल्याचे दिसले ही लक्षणीय बाब आहे. विरोधकांमध्ये फाटाफूट किंवा काही नेते आलेच नाहीत असे प्रकार घडलेले नाही. टीव्ही वाहिन्यांच्या एक्झिट पोलनंतर आपले मनोधैर्य टिकवणे व पराभव झालाच तर त्याला सामोरे जाणे हे करणे विरोधकांसाठी सोपे असणार नाही. त्या स्थितीत त्यांनी एकत्र राहणे हेच त्यांच्या हिताचे आहे. अरविंद केजरीवाल पुन्हा तुरुंगात गेले आहेत. ते आता कधी बाहेर येतील हे कोणी सांगू शकत नाही. मोदी पुन्हा सत्तेत आलेच तर कदाचित आणखीही नेत्यांवर अशीच पाळी येईल. पण हे सर्व नंतरचे. तूर्तास चार जूनच्या मतमोजणीच्या वेळी सर्व केंद्रांवर विरोधकांच्या प्रतिनिधींनी जागरुक राहणे व आकडेवारीमध्ये काही घोळ नाहीत ना यावर बारीक लक्ष ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.

विचार

# चिनी व्यापारविश्वातील चढ-उतारांचे आव्हान

***चीनमध्ये मागणीच्या तुलनेत पुरवठा वाढला आहे. हा माल भारतात ओतण्याचा चीनचा प्रयत्न आहे. त्यामुळे केंद्र सरकारने चिनी मालावर बारीक लक्ष ठेवावे, अशी मागणी देशातील उद्योजकांकडून होत आहे. मात्र या आणि एकूणच चीनी बाजारपेठेत निर्माण होत असलेल्या तरंगांचा फायदा घेण्याची संधी भारताला मिळण्याची शक्यता आहे. या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील तरंग समजून घेण्याचा केलेला प्रयत्न.***

**हेमंत देसाई**

चीनमधून आयात केल्या जाणाऱ्या इलेक्ट्रिक व्हिइकल (ईव्ही) बॅटरीज, कॉंप्युटर चिप्स, वैद्यकीय उत्पादने व इतर अनेक वस्तूंवर अमेरिकेने आयात शुल्क वाढवले आहे. त्यामुळे आपल्याकडे शिल्लक राहिलेला माल चीन भारताच्या बाजारपेठेत पडेल भावात विकून टाकेल, अशी भीती आहे. चीनमध्ये विविध क्षेत्रांमध्ये जादा उत्पादनक्षमता निर्माण झाली असून मागणीपेक्षा पुरवठा वाढला आहे. या मालाचे नेमके करायचे काय, हा चीनपुढचा खरा प्रश्न आहे. त्यामुळे केंद्र सरकारने चिनी मालावर बारीक लक्ष ठेवावे, अशी मागणी फेडरेशन ऑफ इंडियन एक्सपोर्ट ऑर्गनायजेशन्स (एफआयईओ)चे अध्यक्ष अश्वनीकुमार यांनी केली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी चीनमधून आयात केल्या जाणाऱ्या लिथियम-कोबाल्ट मूलद्रव्यावरील कर शून्य टक्क्यांवरून २५ टक्के, औषधे-रसायने यावरील कर ५० टक्के, सेमिकंडक्टर्सवरील कर २५ टक्क्यांवरून ५० टक्के, कारसाठी लागणाऱ्या बॅटऱ्यांवर साडेसात टक्क्यांवरून २५ टक्के आणि ॲल्युमिनियम उत्पादनावरील आयात शुल्क साडेसात टक्क्यांवरून २५ टक्यांवर नेले आहे. माल उतरवणाऱ्या क्रेन्स, रबरी मोजे, विजेवर चालणाऱ्या मोटारी यावरील करांमध्येही दणदणीत वाढ करण्यात आली आहे. जगातील ईलेक्ट्रीक वाहनांच्या बाजारपेठेत निम्मा माल केवळ चीनचाच असतो. मात्र या आणि एकूणच चीनी बाजारपेठेत निर्माण होत असलेल्या तरंगांचा फायदा घेण्याची संधी भारताला मिळण्याची शक्यता आहे.

इलेक्ट्रीक वाहनांसाठी लागणाऱ्या बॅटऱ्यांच्या उत्पादनात चीनची मक्तेदारी आहे. सीएटीएल ही चीनमधील सर्वात मोठी बॅटरी उत्पादक कंपनी जगातील दोनतृतीयांश बॅटऱ्या बनवते. टेस्ला, फोक्सवॅगन, टोयोटा मोटर या कंपन्यांना हीच कंपनी बॅटऱ्या पुरवते. बॅटऱ्यांखेरीज इतर अनेक वस्तू चीन अत्यल्प खर्चात बनवतो. उत्पादनक्षमता प्रचंड असल्यामुळे खर्चही कमी येतो. रबरी हातमोजे, पीपीई किट्स, रसायने, औषधे अशा अनेक गोष्टींच्या निर्मितीवर चीनचे वर्चस्व आहे. एलॉन मस्क यांची टेस्ला ही कार अत्यंत लोकप्रिय आहे. आज ना उद्या टेस्लाचे उत्पादन भारतात सुरू होण्याची शक्यता आहे. परंतु कमी किमतीत उपलब्ध असल्यामुळे चीनच्या कार्सना उत्तम मागणी आहे. आता टेस्लाच्या मागणीत पूर्वीच्या तुलनेत घट झाली असून मस्क यांनी चीनला भेट देऊन आपले हितसंबंध जपण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

चीन अमेरिकेला दर वर्षी ४२० अब्ज डॉलर्स इतक्या मालाची निर्यात करतो. त्यापैकी १८ अब्ज डॉलर्स इतक्या मालावर अमेरिकेने जादा कर लादले आहेत. परंतु आता युरोपियन युनियनही चिनी मालावर निर्बंध लादण्याची शक्यता आहे. गेल्या ऑक्टोबरमध्ये युरोपियन कमिशनने चीन सरकार अनुदाने देऊन वेगवेगळ्या मालाची निर्यात करत आहे का, हे तापसण्याचे काम एका यंत्रणेस सुपूर्द केले. याचा अर्थ, युरोपीय देशही चीनवर करांचा बडगा उगारण्याची शक्यता आहे. याखेरीज, अमेरिका २०२५ आणि २०२६ या वर्षांमध्ये सेमि कंडक्टर्स, ईव्हीमध्ये वापरल्या न जाणाऱ्या बॅटऱ्या, ग्राफाइट आणि पर्मनंट मॅग्नेट, रबर मेडिकल अशा अनेक वस्तूंवर जादा आयात शुल्क लावणार आहे. त्यामुळे भारताला अमेरिका आणि युरोपमध्ये निर्यातीच्या उत्तम संधी उपलब्ध होणार आहेत. फेस मास्क, पीपीई किट, सीरिंज आणि सुया, वैद्यकीय हातमोजे, लोखंड-पोलाद, ॲल्युमिनियम आदी भारतीय वस्तूंना युरोप-अमेरिकेत चांगली बाजारपेठ मिळू शकेल. तसेच अमेरिकेला प्रत्युत्तर म्हणून चीननेही अमेरिकन मालावर निर्बंध आणल्यास आपण चीनमध्ये व्यापार वाढवू शकतो. डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे अध्यक्ष असताना चीन आणि अमेरिकेमध्ये व्यापारी युद्ध झाले होते. ट्रम्प हे आक्रस्ताळे आणि बेताल गृहस्थ होते. त्यांनी चीनवर सरसकट आयातनिर्बंध लादले. चीननेही त्यांना तशाच पद्धतीने प्रत्युत्तर दिले. याचे पडसाद जागतिक बाजारपेठेत पडले आणि शेअर तसेच कमॉडिटी बाजाराला धक्का बसला. बायडेन यांनी मात्र सरसकटपणे नव्हे, तर मर्यादित प्रमाणात निर्बंध घातले असून एकूण जागतिक बाजारपेठेत चुकीचे संदेश जाणार नाहीत, याचीही काळजी घेतली आहे. भारत सरकारने मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारत अशा स्वरूपाच्या घोषणा दिल्या आहेत. त्यासाठी कारखानदारांना प्रोत्साहनपर सवलतीही देण्यात आल्या आहेत. चीनने भारतात घुसखोरी केली, तेव्हा दोन्ही देशांचे संबंध कमालीचे बिघडले आणि अनेक चिनी ॲप्सवर बंदी घालण्याची घोषणा झाली. चीनमधून आलेल्या कोणत्याही वस्तू वापरायच्या नाहीत, अशा गर्जना करण्यात आल्या. मात्र चीनद्वेषाची ही लाटही ओसरली. शिवाय मोबाइल, लॅपटॉप, औषधे, सौर ऊर्जा या क्षेत्रांसाठी लागणारा कच्चा माल आणि घटक या बाबतीत भारत चीनवरच अवलंबून आहे. तेव्हा नुसत्या गर्जना करून उपयोग नाही. आता अमेरिकेचे दरवाजे काही प्रमाणात बंद झाल्यामुळे चिनी मालाने भारतीय बाजारपेठेवर घुसखोरी करून वर्चस्व मिळवण्याचा प्रयत्न केला तर त्यावर 'अँटी डम्पिंग ड्यूटीज' लादण्याची तयारी भारताला दाखवावी लागेल. अन्यथा, स्वस्त चायनीज माल आपली बाजारपेठ पादाक्रांत करून इथल्या दुकानदारांवर आपली दुकाने बंद करण्याची वेळ येईल.

चीनमधून होणाऱ्या आयातीत वाढ झाल्यामुळे व्यापार असमतोलाचा आलेख सातत्याने वाढत आहे. नुकत्याच प्रकाशित झालेल्या अहवालानुसार, चीनमधून इलेक्ट्रॉनिक हार्डवेअर वस्तूंच्या आयातीवर नियंत्रण ठेवण्यासाठी 'ऑनलाईन मॉनिटरिंग सिस्टीम' सुरू करण्यात आली असली तरी नोव्हेंबर २०२३ ते मार्च २०२४ या पाच महिन्यांमध्ये चीनमधून लॅपटॉप आणि टॅब्लेटसह संगणकांची आवक ४७.१ टक्क्यांनी वाढली आहे. या कालावधीत भारताने चीनकडून २७३.६ दशलक्ष डॉलर किमतीचे इलेक्ट्रॉनिक हार्डवेअर आयात केले आहे. ही उत्पादने तैवान आणि हाँगकाँगमधून आयात केली असली, तरी चीनमधून आयातीचे मूल्य त्यांच्यापेक्षा किती तरी पटींनी जास्त आहे. २०१९-२० पासून चीनमधून आयातीमध्ये सातत्याने वाढ होत असून आयात ४४ टक्क्यांनी वाढली आहे तर चीनला होणारी निर्यात जवळपास स्थिर आहे. २०२३-२४ मध्ये चीनमधून होणारी आयात ७०.३२ अब्ज डॉलरवरून ४४.७ टक्क्यांनी वाढून १०१.७५ अब्ज डॉलर झाली आहे. २०२३-२४ मध्ये चीनला भारताची निर्यात १६.६६ अब्ज डॉलर होती. चीनकडून आयात वाढल्याने भारताची चीनसोबतची व्यापार तूट वाढली आहे. अत्यावश्यक आणि सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या क्षेत्रातही भारत चीनमधून आयात केलेल्या उत्पादनांवर खूप अवलंबून आहे. चीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी उचलण्यात आलेल्या धोरणात्मक पावलांचा अद्यापही विशेष परिणाम झालेला नाही.

गेल्या दशकभरापासून स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन देऊन चीनकडून होणारी आयात कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे, यात शंका नाही. चीनमधून आयात केलेल्या औषधे, रसायने आणि इतर कच्च्या मालाला पर्याय निर्माण करण्यासाठी उत्पादन लिंक्ड इन्सेंटिव्ह (पीएलआय) योजनेंतर्गत गेल्या दोन वर्षांमध्ये सरकारने १४ उद्योगांना सुमारे दोन लाख कोटी रुपयांचे वाटप करत प्रोत्साहन दिले आहे. अशा परिस्थितीत चीनसोबतचा व्यापार असमतोल कमी करण्यासाठी आणि चीनच्या उत्पादन क्षेत्रातून बाहेर पडणारी विदेशी गुंतवणूक भारताकडे वळवण्यासाठी नवीन परिणामकारक प्रयत्नांद्वारे देशाला नवीन उत्पादन केंद्र बनवण्यासाठी अधिक प्रयत्न करावे लागतील. चीनसोबतची व्यापारी तूट कमी करण्यासाठी प्रभावी प्रयत्न करावे लागतील. आता पुन्हा एकदा देशातील कोट्यवधी जनतेला चिनी उत्पादनांऐवजी स्वदेशी उत्पादने वापरण्याचा नवा संकल्प घेऊन पुढे जावे लागणार आहे. चीनसोबतच्या व्यापार असमतोलाच्या गंभीर आव्हानाला सरकारच जबाबदार नाही, तर देशातील उद्योग आणि कंपन्याही जबाबदार आहेत. त्यांनी सुट्या भागांसह संसाधनांचे विविध स्रोत आणि मध्यस्थ विकसित करण्यात प्रभावी भूमिका बजावलेली नाही. याशिवाय देशातील बड्या कंपन्या संशोधन आणि नावीन्यपूर्ण क्षेत्रातही खूप मागे आहेत.

भारत २०२७-२८ पर्यंत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याची शक्यता असून भारताची ग्राहक बाजारपेठ २०३१ पर्यंत दुप्पट होण्याची शक्यता आहे. आता भारत हे परदेशी गुंतवणूकदारांसाठी एक आकर्षक ठिकाण बनू शकते. जगप्रसिद्ध 'केपजेमिनी रिसर्च इन्स्टिट्यूट'च्या ताज्या अहवालानुसार, अमेरिकन आणि युरोपीयन कंपन्यांचे उच्च अधिकारी चीनवरील अवलंबित्व कमी करू इच्छित आहेत आणि ते भारतात गुंतवणूक करण्याचा गांभीर्याने विचार करत आहेत. अशा स्थितीमध्ये या गुंतवणुकीच्या शक्यता साकार करण्यासाठी आपल्याला प्रयत्न करावे लागतील. यामुळे भारताचे उत्पादन केंद्र बनण्याची शक्यता वाढेल आणि भारताला स्वावलंबी बनण्यास आणि चीनकडून होणाऱ्या आयातीवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल.

आजकाल

# आपल्यापुढचे खरे आव्हान माहित आहे काय?

**डॉ. नीरज हातेकर**

सगळी व्यवस्था कोणी ना कोणी विकत घेतली आहे. प्रशासन, कायदा, न्याय, विद्यापीठे, इतर सगळ्या सार्वजनिक व्यवस्था........

पुणे पोलीस, ससून इस्पितळ वगैरे अपवाद नाहीत. जे होतंय तो नियम झालाय. फार ओरडा झाला की तोंड देखले काही तरी करतात. आज महाबळेश्वर मधला अग्रवाल चा रिसोर्ट सील केलाय. पण गेल्याच वर्षी सातारच्या जिल्हाधिकाऱ्यांनी महाबळेश्वर मधल्या अनाधिकृत बांधकामावर कारवाई केली तर २४ तासात त्यांची बदली झाली. हे महाबळेश्वर, पुण्यातच होतंय असे नाही आणि फक्त जमिनीचाच प्रश्न आहे असेही नाही. एकूणच व्यवस्था ह्या लोकांसाठीच काम करते. मुंबई विद्यापीठात असताना राजभवन कसे काम करते, कोणासाठी करते हे खूप जवळून पहिले आहे. ज्यांच्या शिक्षणाशी कसलाही संबंध नाही अश्या लोकांना खुश करायला निरर्थक चौकशा लावल्या जायच्या, आणि खाजगीत कुलगुरू फोन करून सांगायचे कि ''हे चुकीचे होतंय हे मला माहित आहे पण माझा इलाज नाही.'' वगैरे. भाजपचे एक केंद्रीय राज्य मंत्री होते. विभागात प्रमुख कोण होणार ह्या साठी ते थेट राज्याच्या शिक्षण मंत्र्याच्या दालनात येऊन बसायचे. शिक्षण मंत्राचे वगैरे पण मग ''सर आता काय करणार...'' सांगून शेपटी घालायचे. हे विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते. ज्यांची कामे करायचे ते फक्त ''खास मर्जीतल'' लोक म्हणून करायचे. शैक्षणिक कारकीर्द शून्य. कुलगुरू वगैरे लोक विद्यापीठाचे नाही तर स्वताचे हित संबंध जपतात. आज जी विद्यापीठाची परीस्थीती झाली आहे ती डोळ्याने दिसतेच आहे. हे सगळ्या व्यवस्था बाबत खरे आहे. कॉंग्रेस, भाजप, राष्ट्रवादी, सगळेच व्यवस्था विकण्यात आणि मालकांची कामे करण्यात सामील. एका कोणत्या पक्षावर काय ठपका ठेवणार?

पण हे शेवटी का झाले? कारण आपण नागरिक म्हणून आपले काम सोडून दिलेले आहे. आपण स्वतःला मतदार मानतो. ती चूक आहे. मतदार असणे म्हणजे पाच वर्षांनी आपले मत देण्याचे ''कर्तव्य'' पार पडणे. मत द्यायचे आणि मग फेसबुक वर बोट दाखवायचे. जे मतदान करणार नाहीत त्याना कर्तव्यचूत वगैरे म्हणायचे. नंतर, निकाल वगैरेची चवीने चर्चा करायची. ही लोकशाही नव्हे. हा लोकशाहीचा शो आहे. खरे तर आपण फक्त मतदार नाही तर नागरिक आहोत. आपल्या गावाचे, शहराचे, राज्याचे, देशाचे, भागधारक आहोत. मालक आहोत. नागरिक हा बाराही महिने, चोवीस तास नागरिक असतो. नागरिक असणे म्हणजे आपल्या गावाच्या, शहराच्या, राज्याच्या, देशाच्या सद्य परिस्थितीवर, भविष्यावर परिणाम करणाऱ्या प्रत्येक गोष्टीबाबत सातत्याने जागरूक असणे. मतदार पाच वर्षांनी एकदाच असतो, नागरिक चोवीस तास, बारही महिने असतो. पण आपण नागरिक म्हणून आपले कर्तव्य करतो. आपल्या वाटते की हे काम आपले नाही. आपण निवडून दिलेल्या लोकांनीही कामे करावीत. ही अपेक्षा चुकीची नाही. पण जर मालक जागरूक नसेल तर मग नोकरच मालक बनतात. म्हणून आपण सतत टक्क जागे राहिले पाहिजे. व्यवस्थेवर आपला वचक सातत्याने कसा राहील हे पहिले पाहिजे. आपल्याकडे माहितीचा अधिकार आहे, रस्त्यावर येण्याचा हक्क आहे. ह्या गोष्टी सातत्याने वापरायच्या, बोथट न होऊ देता वापरून वापरून धारधार ठेवायच्या आहेत.

हे केले नाही तर आपण निवडून दिलेले लोकच आपली व्यवस्था विकून टाकतात. खरेदीदार काय, बसलेच आहेत. आपणच आपली व्यवस्था विकून टाकायची मुभा देऊन टाकली आहे. जगात जी शहरे, राष्ट्रे, विद्यापीठे, वगैरे टिकली ती तिथल्या नागरिकांनी टिकवली आहेत. त्यांनी निवडून दिलेल्या लोकांनी नाही. वाईत राहतो. वाई शहरात चांगले, निरोगी आयुष्य जगता येईल असे शहराचे स्वरूप राहील ही नागरिक म्हणून माझी जबाबदारी आहे. नगरपालिका, आमदार, प्रशासन ह्यांच्यावर अंकुश राहिला तरच हे होईल. नाहीतर हे लोक दुसरा मालक शोधतात लगेच. साधा गाडी धुणारा पोऱ्या मालकाने निट लक्ष दिले नाही तर गाडी नीट धूत नाही. मग आमदार, नगरसेवक, कलेक्टर, कुलगुरू, ह्याचे काय? मग रडून उपयोग नाही. तुम्हाला खाटल्यावर कोणी काहीही आणून देणार नाही. मालक म्हणून वागायला शिका. भागधारक आहात, लाभधारक नाही. कळीचा आहे. एकत्र येऊया. वाईकर मंडळी, पुढच्या आठवड्यात मंगळवारी मिटिंग ठेवली आहे. ९८२०३०३४७९ वर फोन करून जागा आणि वेळ ठरवूया.

लोकसंसद

## दशकाची प्रतीक्षा संपेल

अमेरिकेत होणाऱ्या आयसीसी टी-२० विश्वचषकाची होणारी सुरुवात अमेरिकन आणि कॅनडा मधील क्रिकेट चाहत्यांना मोठी पर्वणी म्हणावी लागेल.कारण बेसबॉल, बास्केटबॉल आणि फुटबॉलचे शौकीन असणाऱ्या अमेरीकन क्रिकेप्रेमींना आयसीसी वर्ल्डकपच्या माध्यमातून टी -२० क्रिकेटचा थरार पाहता आणि अनुभवता येणार आहे.भारत हा संभाव्य विजेता संघ म्हणून असला तरी, अफगाणिस्थान आणि ऑस्ट्रेलिया संघाचे कडवे आव्हान असणार. तसेच आज पर्यंत एकही आयसीसी चषकस्पर्धा अंतिम फेरीत प्रवेश करून सुद्धा त्या पासून दुरावलेले दोन संघ साऊथ आफ्रिका आणि न्युझीलंड हे प्रयत्नांची पराकाष्ठा करणार. गेल्या बारा महिन्यांच्या कालावधीत आयसीसी स्पर्धेत भारताला दोनदा उपविजेता संघ म्हणून समाधन मानावे लागले आहे.२०१३ आयसीसी चॅम्पियन्स जिंकल्यानंतर भारतीय संघाला अंतिम सामन्यात विजय मिळवता आला नाही.हे वास्तव जरी असेल तरी भारतीय संघ पारंपारिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानी संघाल नमवून २०१३ पासूनची विजयाची प्रतीक्षा संपवून टी-२० विश्वचषक जिंकेल. क्रिकटचे वेड हे बेसबॉल, फुटबॉल, बास्केटबॉलच्या मर्यादा ओलांडून सर्वत्र पसरत आहे हे विशेष मानावे लागेल. भारतीय संघ दशकाची प्रतीक्षा संपवेल अशी अपेक्षा आहे.

**- दत्तप्रसाद शिरोडकर, मुंबई**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**३ जून**

**१८७७ :-** इतिहास संशोधक, चरित्रकार बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी यांचा जन्म. आपल्या चांद्रसेनीय कायस्थ प्रभूच्या समाजाचा इतिहास त्यांनी उजेडात आणला. याशिवाय बाजी प्रभू देशपांडे, मुरारबाजी देशपांडे यांची चरित्रे त्यांनी लिहिली. याशिवाय चिटणीस, चित्रे या ऐतिहासिक कायस्थ घराण्याची कागदपत्रे, इतिहास त्यांनी प्रकाशात आणला आणि चांद्रसेनिय कायस्थ प्रभूंच्या ग्रामण्यांची संक्षिप्त माहिती व आज्ञापत्रे हा ग्रंथ त्यांनी साकारला. स्वजातीच्या अभिमानातून फार मोठे ऐतिहासिक कार्य त्यांच्या हातून साकारले. **१८८२:-** लेखक, पत्रकार, संपादक भगवंत बळवंत पाळेकर यांचा जन्म. दिनबंधूतून लेखन करणाऱ्या पाळेकरांनी बडोद्यातून जागृती नावाचे साप्ताहिक सुरु केले. **१८९२:-** कथालेखिका, आत्मचरित्रकार आणि बालसाहित्यकार आनंदीबाई शिवराम शिर्के यांचा जन्म ३ जून १८९२ रोजी झाला. माहेरचे नाव अनुसूया गोविंदराव शिंदे. त्यांचे वडील बडोदा संस्थानात नोकरीला होते. मिस मेरी भोर या ब्रिटीश शिक्षणाधिकारी महिलेकडून त्यांना शिक्षणाचे प्रोत्साहन मिळाले. पुढे त्याचे रुपांतर लेखिकेत झाले. 'कुमारी आनंदी' या नावाने त्यांनी लेखन सुरु केले. शारदाबाईंचे 'संसारशिल्प' ही कथा व 'स्वच्छता' हा निबंध मासिक मनोरंजन मधून प्रसिद्ध झाला. यानंतर 'बेगम दिलआरा ही त्यांची कथा मराठीमित्र मध्ये प्रकाशित झाली. दरम्यानच्या काळात मराठीमित्रांचे सहसंपादक शिवरामभाऊ शिर्के यांच्याशी परिचय झाला. त्यांचे रुपांतर विवाहात झाले. पण त्या काळात या विवाहाला विरोध झाला. पतीच्या प्रोत्साहनाने त्यांचे लिखाण सुरुच राहिले. कथाकुंज' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. त्यानंतर कुंजविकास, जुईच्या कळ्या, भावनांचे खेळ व इतर गोष्टी. तृणपुष्पे, साखरपुडा, गुलाबजाम आदी कथासंग्रह त्यांचे प्रसिद्ध झाले. त्यांच्या कथातून तत्कालिन स्त्रियांच्या सामाजिक समस्या लक्षात येतात. पुरोगामी विचारसरणी हे त्यांच्या कथांचे वैशिष्ट्ये. नर्मशृंगार सहजतेने कथेत आणणाऱ्या त्या पहिल्या स्त्रीकथाकार आहेत. हे 'दांपत्यजीवन' सारख्या कथेवरून लक्षात येते. आनंदीबाईंनी कुरुप राजकन्या व तेरावी कळ आणि इतर गोष्टी' वाघ-ाची मावशी व इतर गोष्टी, आदी बालकथा लिहिल्या 'रुपाली' ही कादंबरी ही त्यांच्या नावावर आढळते. 'सांजवात' या त्यांच्या आत्मचरित्रातून तत्कालिन साहित्यिकांचाही आपल्याला परिचय होतो. स्त्रियांच्या भाषेचा परिणामकारक वापर आपल्या लेखनात करणाऱ्या या कथालेखिकेचे ३१ ऑक्टोबर १९८६ रोजी निधन झाले. अनुसूया शिंदे यांचा विवाह शिवराम शिर्के यांच्याशी १९१३ साली झाला. त्या आता आनंदीबाई शिवराम शिर्के या नावाने ओळखला जाऊ लागला. **१८९८:-** 'जातिभेद विवेकसार' हा ग्रंथ लिहिणारे, संतवाङ्मयाचे अभ्यासक आणि संपादक तुकारामतात्या वळ यांचा जन्म. 'तत्त्वविवेचक' छापखान्याचे ते संचालक होते. 'तुकारामबाबा व त्यांचे शिष्य यांच्या अभंगांची गाथा' (दोन खंडांत) व 'श्री एकनाथ महाराजांच्या अभंगांची गाथा' ही त्यांची संपादने महत्त्वपूर्ण ठरली. **१९२८:-** लेखक ज्योतिर्विद, सायनामताभिमानी नारायण सदाशिव मराठे यांचे निधन. 'स्पष्ट ग्रहांचा उपयोग' हे त्यांचे पुस्तक ज्योतिर्विदास उपयुक्त आहे. **१९३८:-** लेखक डॉ. शरद विठ्ठलराव सालफणे यांचा जन्म. पेशाने डॉक्टर. यांचा 'अक्षरलेणी' हा स्फूटलेखसंग्रह आणि 'गुलकंद' हा कथासंग्रह प्रकाशित झाला आहे. **१९३९:-** संगीतशास्त्राचे लेखक गंगाराम भिकाजी आचरेकर यांचे निधन. त्यांचे बरेचसे लेखन स्फूटलेखनस्वरुपाचे आहे. 'शालेय संगीत पध्दतीचे सात भाग', 'शालोपयोगी प्रार्थनागीतमाला' आणि 'शास्त्रीय संगीत राग पध्दती' ही त्यांची शैक्षणिक ग्रंथनिर्मिती. तसेच त्यांच्या संशोधनाचे सर्व सार 'भारतीय संगीत स्वरशास्त्र', 'प्राचीन शुध्दकाकल्यानंतर मत्सराकृता मूर्च्छाना' अर्थात आधुनिक केदार थाट या पुस्कात आला आहे. **१९३९:-** विविध नियतकालिकातून लेखन करणारे डॉ. मधुकर गोविंद देशपांडे यांचा जन्म. 'जीवनगीत' ही कादंबरी, 'मृत्यूगीत', 'सल' या काव्यसंग्रहासह 'मनोरंजनातून संस्कार भाग १,२,३' प्रकाशित झाले आहे. **१९५६:-** नाटककार वीर वामनराव जोशी यांचे निधन. 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' आणि 'रणदुंदुभी' ही त्यांची नाटके रंगभूमीवर गाजली. 'हिंदुस्थान' साप्ताहिक त्यांनी चालविले होते. 'झोटिंग पातशाही' हे शेक्सपिअरच्या मेझर फॉर मेझर या नाटकावर आधारित असून मोना व्हॅना या फ्रेंच नाटकावर आधारित 'शीलसंन्यास' हे नाटक त्यांनी लिहिले आहे. स्वातंत्र्यकांक्षी व राष्ट्रवादी वृत्तीचे नाटककार असा नावलौकिक त्यांनी संपादन केला होता. **१९७३:-** कथालेखिका हिरा रामकृष्ण कर्नाड यांचे निधन. 'पिवळ पातळ हिरवी चोळी', 'आंधळा मागतो एक डोळा', 'प्रेमा मी वंदिले' हे कथासंग्रह आणि 'आकाशाचे आसू', 'अबोल झाली सतार' या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. स्त्री जीवनातील चिरपरिचित अनुभव त्यांच्या लेखनातून आढळतात. त्यांचा मुलगा प्रमोद याने आपल्या आईच्या जीवनावर 'व्यथाफूल' ही चरित्र कादंबरी लिहिली. **२०१४:-** 'सत्यकथा आणि मौज' या दोन वाङ्मयीन नियतकालिकांद्वारे मराठी साहित्य क्षेत्रात साक्षेपी संपादनाचा मापदंड निर्माण करतानाच अनेक साहित्यिक घडविणारे ज्येष्ठ संपादक राम पटवर्धन यांचे निधन. 'केसरी' मध्येही त्यांनी काही काळ लेखन केले.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३ जून

१) श्रीम. विजया जयवंत पाटील
नारंगी, अलिबाग, ३-६-१९४३

२) श्री. रामराया शेशप्पा नायक
अलिबाग, ३-६-१९४९

३) श्री. अशोक रामचंद्र गुरव
वेश्वी, अलिबाग, ३-६-१९५६

४) श्री. शैलेश नारायण घोसाळकर
गोंधळपाडा, अलिबाग, ३-६-१९५८

५) श्रीम. नलिनी गणेश पाटील
अलिबाग, ३-६-१९५९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**श्रीमती सुनंदा कुलकर्णी, अलिबाग**
**रिया रवींद्र म्हात्रे, वाढदिवस**



**स्व. नरेंद्र नाथालाल मेहता यांचे स्मरणार्थ**

## गोविंद शिंगाडे यांचे निधन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते गोविंद झिमा शिंगाडे यांचे निधन झाले आहे. जुम्मापट्टी धनगर वाडा येथे राहणारे शिंगाडे हे वयाच्या ६५ पर्यंत माथेरान येथे दूध घेऊन जायचे आणि संध्याकाळी नेरळ येथे दूध घेऊन जायचे. त्यांचा हा सर्व प्रवास बहुतेक वेळा पायीच असायचा. त्यामुळे गोविंदा शिंगाडे यांना माथेरानचे बदलाचे साक्षीदार समजले जात होते.




नेरळ माथेरान घाटरस्त्याच्या दरम्यान असलेल्या जुम्मापट्टी धनगरवाडा येथे राहणारे गोविंद शिंगाडे हे दूध व्यवसाय करायचे. माथेरान डोंगरात राहणारे शिंगाडे हे वयाच्या १५ वर्षांपासून सकाळच्या वेळी जुम्मापट्टी येथून माथेरान आणि संध्याकाळी जुम्मापट्टी येथून नेरळ असा व्यवसाय करायचे. नेरळ माथेरान मिनीट्रेनच्या ७० वर्षांच्या बदलाचे साक्षीदार म्हणूनदेखील गोविंद शिंगाडे ओळखले जायचे. नेरळ ग्रामपंचायतीमधील सदस्य संतोष शिंगाडे हे त्यांचे पुत्र आहेत.

## पंढरीनाथ थळे यांचे निधन

**। सोगाव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील बहिरोळे येथील सामाजिक कार्यकर्ते पंढरीनाथ विठु थळे यांचे गुरुवार, दि.३० मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. निधनसमयी ते ९० वर्षांचे होते. त्यांच्या निधनाची बातमी समजताच पंचक्रोशितील बांधवांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले. त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी बहिरोळे पंचक्रोशीतील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात भाऊ, एक मुलगा, चार मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कै. पंढरीनाथ थळे यांचा दशक्रिया विधी शनिवार, दि. ८ जून रोजी, तर तेरावे रविवार, दि. ९ जून रोजी बहिरोळे येथील राहत्या घरी होणार आहे.



### सांगोला-कडलास रस्ता अद्याप रखडलेलाच

# कडलास ग्रामस्थ उतरले रस्त्यावर

- **डॉ.बाबासाहेबदेशमुखांचा आंदोलनात सहभाग**
- **१५ जूनपर्यंत रस्त्याचे काम करण्याचे लेखी आश्वासन**

**। कोळा । प्रतिनिधी ।**

सांगोला येथील सांगोला कडलास रोड नदी पुलाजवळील बरेच वर्षे रखडलेल्या रस्त्याचे काम अद्यापही अपूर्ण असल्याने व याठिकाणी वारंवार अपघात होत असल्याने सदरच्या रखडलेल्या रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे याकरिता समस्त कडलास ग्रामस्थ यांच्यावतीने शनिवारी (दि.१) भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी कडलास ग्रामस्थांसह डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी स्वत: रस्त्यावरच ठिय्या मांडला होता. त्यामुळे रस्त्याच्या दुतर्फा वाहनाच्या रांगा लागल्या होत्या.



याप्रसंगी पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष व शेकाप नेते डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी रखडलेले काम लवकरात लवकर मार्गी लावावे, अशी मागणी करत संबंधित विभागाच्या कामकाजाविषयी तीव्र संताप व्यक्त केला. त्यावेळी संबंधित विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी १५ जूनपर्यंत रस्त्याचे काम करु, असे लेखी दिल्यामुळे हे आंदोलन मागे घेण्यात आले.

सदर रास्ता रोकोप्रसंगी दत्ताभाऊ टापरे, दत्ताभाऊ जाधव, सरपंच दिगंबर भजनावळे, शेतकरी सहकारी सूतगिरणीचे व्हा. चेअरमन ॲड. नितीन गव्हाणे, समाधान पवार, राहुल गायकवाड, संभाजी साळुंखे, संजय गायकवाड, पांडुरंग भजनावळे, अशोक ठोकळे, केशव गायकवाड, ताजू इनामदार यांच्यासह कडलास ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सांगोला पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भीमराव खणदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## मुरुडमध्ये दोघांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल

**। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील उसरोली येथे राहणाऱ्या यशोदा सोनू बिरवाडकर यांचे घर बांधण्यासाठी त्यांनी गावालगत राहणाऱ्या दोन व्यक्तीस घर बांधण्याचे काम दिले. परंतु, घर अर्धवट ठेवून पैसे मात्र उकळलेले. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याची तक्रार यशोदा बिरवाडकर यांनी नोंदवली आहे. त्यांच्या या तक्रारीवरून मुरुड पोलीस ठाण्यात दोन व्यक्तींवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, अदाड येथील पांडुरंग महादेव पाटील व खारीकवाडा येथील महेशवर अशोक ठाकूर यांनी कॉन्ट्रॅक्टर असल्याचे सांगून यशोदा बिरवाडकर यांच्या घराचे काम घेतले. घर बांधण्याच्या कराराप्रमाणे फिर्यादी यांचे घर पूर्ण केले नाही. घर पूर्ण करतो असे सांगून फिर्यादीकडून २ लाख ४६ हजार अशी रक्कम घेतली. घराचे काम कधी पूर्ण करणार असे विचारले असता त्यांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली. अशी तक्रार बिरवाडकर यांनी मुरुड पोलीस ठाण्यात नोंदवताच या दोघांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.



## स्मिता सानप सेवानिवृत्त

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील वरसगाव या गावच्या रहिवासी असणाऱ्या स्मिता सतीश सानप आरोग्य खात्यातून दि. ३१ रोजी सेवानिवृत्त झाल्या आहेत. जांभुळपाडा येथे आरोग्य सहाय्यिका या पदावरून त्या सेवानिवृत्त झाल्या. त्यानिमित्त निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात त्यांचा सन्मान करून भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी माजी सरपंच सुशील शिंदे, रमेश सानप, डॉ. गणेश गायकवाड, विनायक रूगे, आबा शिंदे, सहदेव कापसे, हरिश्चंद्र खरिवले, अनिल खरिवले, नितिन खरिवले, रमेश खरिवले, समीर खरिवले, रमेश शिर्के, नथुराम पाष्टे, चंद्रकांत गुलगुले, परशुराम दळवी, पो.पाटील चंद्रकांत सानप, एकनाथ बागुल, राजेंद्र सानप, नामदेव सानप, गणेश सानप, दत्ताराम बक्कम, दिलीप सानप आदींसह त्यांचा मित्र परिवार तसेच आप्तस्वकीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शशिकांत गावंड यांना निरोप

**। गडब । वार्ताहर ।**

पेण तालुक्यातील बोर्वे येथील रहिवासी पेण येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कनिष्ठ सहाय्यक पदावर काम करीत असलेले शशिकांत गावंड नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमानिमित्त पेणचे नायब तहसीलदार प्रवीण परदेशी, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य विद्या पाटील, एस.जे. साळुंखे, पी.एस. फड, एस.आर. पवार, दिनेश मगर, शोभा गावंड, राष्ट्रीय कबड्डी खेळाडू ऋणाली मोकल, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन पंच मंडळाचे सदस्य के.जी. म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे आदींसह औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिक्षक, कर्मचारी गावंड यांचे कुटुंबिय उपस्थित होते.

शशिकांत गावंड यांना संस्थेने दिलेली जबाबदारी पार पाडत असत. गावंड हे संघर्ष करुन या पदावर पोहोचले आहेत. त्यांनी नागोठणे, पेण येथेदेखील उत्तम काम केले आहे. संस्थेतील क्रीडा कार्यक्रमात गावंड यांचे महत्त्वाचे योगदान असायचे, असे यावेळी प्रा. विद्या पाटील यांनी सांगितले. माझ्या सेवा काळात येथील प्राचार्या, शिक्षक, कर्मचारी यांनी मला सहकार्य केले असून, त्यांच्या सहकार्यामुळे मी येथे उत्तम काम करु शकलो, असे यावेळी शशिकांत गावंड यांनी सांगितले.



## पोस्टमास्टर हमदुले सेवानिवृत्त

**। अलिबाग । वार्ताहर ।**

नागाव पोस्टाचे सब पोस्टमास्टर इस्माईल हमदुले यांचा कर्मचाऱ्यांच्यावतीने सेवानिवृत्ती कार्यक्रम हॅप्पीनेस स्नेहालीला रिसॉर्ट येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला नागाव ग्रामपंचायत सरपंच हर्षदा मयेकर, निखिल मयेकर, रायगड डाक अधीक्षक सुनील थळकर, सहाय्यक अधीक्षक सुनील पवार व अलिबाग पोस्टमास्टर संजय सळकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्ज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी शाकिल कडू, सैफ्फूदिन फिरफिरे, स्मिता जवळे, विद्या घोडिंदे, कुंटे मॅडम, संजय केळकर, रमेश केराम, सुनील नांदगावकर, प्रवीण साळुंखे, गिरीष जोशी, सुरेश खडपे यांनी हमदुले यांच्याविषयीचे मनोगत व्यक्त केले.



दरम्यान, यावेळी इस्माईल हमदुले यांचा डाक अधीक्षकांच्या हस्ते पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व मानपत्र देऊन सपत्नीक गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास महाड, इंदापूर, माणगाव, पुणे, कोलाड, पेण, मुरूड येथील डाक कर्मचाऱ्यांची उपस्थिती पाहून ही माझ्या चाळीस वर्षांच्या केलेल्या कामाची पोहोच पावती आहे, असे हमदुले म्हणाले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता संजय राणे व त्यांच्या टीमने मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुराधा पेणकर यांनी केले.

## दहावीच्या परीक्षेतील गुणवंतांचा गौरव

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील पी.पी. खारपाटील कन्स्ट्रक्शन अँड कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक पांडुरंग खारपाटील व सहव्यवस्थापकीय संचालक राजेंद्र खारपाटील यांचे पिताश्री परशुराम (आबा) धाकू खारपाटील यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून चिरनेर गावातील पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या मराठी माध्यमाच्या व इंग्रजी माध्यमाच्या दहावीच्या परीक्षेत गुणानुक्रमे येणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी मृणाली म्हात्रे, विघ्नेश पाटील, सिद्धी गावंड, दिशा चिर्लेकर, पूर्वा ठाकूर, दिया म्हात्रे, तेजस गव्हाणकर, रोहित भोईर, प्रथमेश फोफेरकर, आदिती पाटील, प्रीती जैस्वाल या विद्यार्थ्यांचा पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष पांडुरंग खारपाटील, उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील, समीर खारपाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांना गौरविण्यात आले.

स्मृतिदिनानिमित्त सोसायटीच्या प्रांगणात बांधण्यात आलेल्या नवीन रंगमंचाचे उद्‌घाटनही यावेळी उद्योगपती पी.पी. खारपाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. याप्रसंगी प्रथम उद्योगपती स्वर्गीय आबा खारपाटील आणि वात्सल्यमूर्ती स्वर्गीय ठकुबाई खारपाटील यांच्या विद्या संकुलनात उभारण्यात आलेल्या अर्धपुतळ्यांना उद्योगपती राजेंद्र खारपाटील यांनी पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले. यावेळी संचालिका अर्चना ठाकूर, सुनीता खारपाटील, लता ठाकूर तसेच खारपाटील यांचे कुटुंबीय, प्रा. सुरदास राऊत, पर्यवेक्षक आनंद चिर्लेकर, प्रशासकीय अधिकारी व्ही.ए. पाटील, मुख्याध्यापिका सुप्रिया म्हात्रे, मंदा घरत, स्मिता मसुरकर तसेच विद्या संकुलनाचे अन्य शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## झेटीएस स्कूलचा १०० टक्के निकाल

**। गोरेगाव । वार्ताहर ।**

येथील सेक्युलर एज्युकेशन ट्रस्ट संचलित झैनाब टोबॅकोवाला सेक्युलर स्कूल गोरेगाव इंग्लिश मिडियम शाळेने १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली असून, अर्वा दळवी ८४.४०% गुण मिळवून प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली. उमामा टोलकर ७७.६०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला असून, शोएब जोगीलकर ७१.८०% गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक पटकावला आहे. दहावी बोर्ड परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे व पालकांचे संस्थेचे चेअरमन ॲड. उदय अधिकारी, सेक्रेटरी क्षमा अधिकारी, मुख्याध्यापिका प्राजक्ता वाडकर यांनी अभिनंदन केले आहे.

## साहिल पवार दहावीत प्रथम

**। रसायनी । वार्ताहर ।**

मोहोपाडा येथील जनता विद्यालय शाळेतून इयत्ता दहावीच्या परिक्षेत ८१.२० टक्के गुण प्राप्त करुन साहिल पवार याने दहावीत प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. साहिलला लहानपासूनच अभ्यासाची आवड आहे. वडील संदीप पवार, आई दिपिका पवार यांच्यासह शाळेतील शिक्षकांचा आपल्या यशात मोठा वाटा असल्याचे साहिलने सांगितले. साहिलने मोहोपाडा जनता विद्यालयातून प्रथम क्रमांक पटकाविल्याबद्दल त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.



## मुख्याध्यापकपदी अर्चना खोत

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील यशवंतनगरच्या श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका म्हणून अर्चना उदय खोत यांची निवड करण्यात आली आहे.

विद्यालयाचे मुख्याध्यापक एस.आर. ओव्हाळ हे नियत वयोमानानुसार ३१ मे रोजी निवृत्त झाले. त्यांच्या जागेवर अर्चना खोत यांची सहजीवन विद्या मंडळाच्या सर्व सदस्यांनी एकमताने निवड केली. त्यानुसार मंडळाचे अध्यक्ष फैरोज घलटे व अन्य सदस्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. संचालक मंडळाने टाकलेला विश्वास सार्थ करण्याचा मी प्रामाणिकपणे प्रयत्न करेन असे सांगून मुख्याध्यापकपदासाठी निवड केल्याबद्दल अर्चना खोत यांनी संचालक मंडळाचे आभार मानले.



यावेळी संचालक कृष्णा अंबाजी, निवृत्त मुख्याध्यापक एस.आर.ओव्हाळ, निवृत्त शिक्षक उदय खोत, शिक्षक सागर राऊत, योगेश पाटील, शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी संतोष बुल्लु, विद्यालयाचे लिपिक मंगेश नांदगावकर, मिलिंद मोहिते, दिपक गोसावी, सौरभ मळेकर, शांताराम वाघमारे, मनिषा शिंदे आदी उपस्थित होते. अर्चना खोत यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## वाढदिवसानिमित्त भेटवस्तू प्रदान

**। रसायनी । वार्ताहर ।**

ग्लोबल केअर फाऊंडेशन आपल्या विविध सामाजिक कार्यासाठी सुपरिचित आहे. माजी आमदार मनोहर भोईर आणि राष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून



त्यांना भेटवस्तू दिली. यावेळी फाऊंडेशनचे अध्यक्ष राजन कडू, उपाध्यक्ष अभय घरत व सचिव प्रीतम टकले आणि विश्वस्त मंडळ उपस्थित होते.



**माणगाव येथील पत्रकार सलीम शेख यांची कन्या अनम शेख हिने दहावीत ८७.८० टक्के गुण संपादन केल्याने तिचे सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक विजयशेठ मेथा यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.**

## स्थानिक टॅक्सी संघटनेचे आंदोलन स्थगित

### माथेरान पोलिसांची यशस्वी मध्यस्थी

**। नेरळ । वार्ताहर ।**

माथेरान दस्तुरी नाका वाहनतळ येथील पार्किंग व्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर असताना आता येथील प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे विकेंडला होत असलेल्या पर्यटकांच्या वाहनांच्या गर्दीमुळे स्थानिक टॅक्सी चालक मालक संघटनेना आक्रमक झाली. दरम्यान, टॅक्सी संघटनेने शनिवारी वाहन बंद आंदोलन पुकारले होते. यामुळे पुन्हा एकदा माथेरान घाटात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. अखेर वनविभागाशी बोलणे करून, नेरळ माथेरान पोलिसांनी मध्यस्थी करून हे आंदोलन स्थगित करण्यात आले.

जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ असणाऱ्या माथेरान येथे विकेंडला मोठ्या प्रमाणात पर्यटकांची वर्दळ वाढत चालली आहे. दरम्यान, खासगी वाहनाने येणाऱ्या पर्यटकांना वाहन पार्किंगच्या मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. अपुरी पार्किंग व्यवस्था त्यातच येथील प्रशासनाचे फसलेले नियोजन यामुळे येथील स्थानिक टॅक्सी चालक तसेच पर्यटकांनादेखील वाहनकोंडीचा सामना करावा लागतो. माथेरान दस्तुरी नाका येथील वनविभागाच्या पार्किंग व्यवस्थापनाच्या ढिसाळ नियोजणामुळे प्रत्येक विकेंडला पर्यटकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. शनिवारीदेखील वाहतूक कोंडीचा सामना पर्यटकांना करावा लागला. तर याचा सर्वात जास्त त्रास स्थानिक टॅक्सी चालकांना झाला. परिणामी, पुन्हा एकदा घाटात २ किमी च्या वाहनांच्या रांगा दिसून आल्या होत्या. सतत होत असलेली वाहन कोंडी यामुळे अखेर आज नेरळ माथेरान नेरळ स्थानिक टॅक्सी चालक मालक संघटनेने वाहन बंद करत ठिय्या आंदोलन माथेरान दस्तुरी या मुख्य नाक्यावरच सुरू केले होते. सकाळी ११ वाजल्यापासून ते दुपारी १२ वाजेपर्यंत असा १ तास बंद पाळून स्थानिक पार्किंग व्यवस्थापन प्रशासनाचा निषेध नोंदवण्यात आला. यावेळी दस्तुरी नाक्यावर मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी तर दुसरीकडे वाहनांची रांग दिसून आली. सदर आंदोलनादरम्यान माथेरान येथील पोलीस रामदासी बापू आणि नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस नरेश नांदगावकर यांनी मध्यस्थी करून वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बोलून पार्किंग व्यवस्थापनेला नियोजन सुधारण्याच्या सूचना केल्या आहेत, तर येणाऱ्या विकेंडला वाहनांची गर्दी होणार नाही म्हणून पूर्वनियोजन केले जाईल, असे आश्वासित केले. दरम्यान, पोलिसांनी केलेल्या मध्यस्थीनंतर स्थानिक टॅक्सी संघटनेने आंदोलन मागे घेत पुन्हा वाहतूक सुरु केली.

## आदिवासींचा पाणीप्रश्न मिटला

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील अनेक भागात नागरिकांना आजही पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. तालुक्यातील नारंगी ग्रामपंचायत हद्दीतील श्री दत्त आदिवासी वाडीमधील पाणीटंचाईची समस्या लक्षात घेत माजी रायगड जिल्हा परिषदेचे सभापती नरेश पाटील यांनी स्वखर्चातून बोअरवेल खोदून दिली. त्यामुळे या गावाची कायमची पाणीटंचाई नरेश पाटील यांच्या माध्यमातून दूर झाली आहे. श्री दत्त आदिवासीवाडीत १८० फुटांवर पाणी लागल्याने नरेश पाटील यांच्या सामाजिक बांधीलकीचे कौतुक होत आहे. पाणीटंचाईची समस्या दूर होऊन भरउन्हाळ्यात ग्रामस्थांची तहान भागल्याने महिला व नागरिकांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद पाहायला मिळत आहे.

# मोदींची ध्यान धारणा खोटी

### माजी न्यायमूर्ती विजय कोळसे पाटील यांचा आरोप

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीच्या निकालात मी हरलो तर, मी देशाचा अवतार आहे असे भासविण्यासाठी नरेंद्र मोदी ध्यानधारणा करायला बसले आहेत. मात्र, त्यांची ध्यान धारणा ही खोटी असून, तुमचे आमचे लक्ष विचलित करण्यासाठी मीडियाला समोर ठेवून ध्यान धारणा सुरू आहे, असा आरोप माजी न्यायमूर्ती विजय कोळसे पाटील यांनी कर्जत येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना केला.

माजी न्यायमूर्ती विजय कोळसे पाटील यांनी यावेळी बोलताना देशात दहा वर्षे मनुस्मृतीप्रमाणे कामकाज सुरू आहे. संविधान नावापुरते राहिले असून, संसद चालत नाही. आपल्या हातात इडी, सीबीआय या सर्व यंत्रणा हातात ठेवून देश चालवत आहे याला काय म्हणावे, असा प्रश्न विजय कोळसे पाटील यांनी उपस्थित केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशिवाय देशात कोणी नाही असे भासवून दररोज खोटे बोलायचे आणि आपल्याशिवाय देशात काही नाही हे



भासाविण्यासाठी हे तपश्चर्या करीत आहेत. आम्हीदेखील तपश्चर्या केली असून, ४९ कॅमेरे लावून तपश्चर्या करायची असते का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. देशातील जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी ही ध्यान धारणा सुरू असून, देश हुकुमशाहीकडे चालला आहे, असा विश्वास व्यक्त केला.

७५ वर्षीय ॲड तुकाराम ढोले हे ट्रक चालक ते वकील आणि एसटी चालकपासून वाहक आणि पुढे दहावीचे शिक्षण पूर्ण करून बीए ही पदवी घेतली आणि वकिलीचा शिक्षणदेखील पूर्ण केले. त्यांनी ठरवा काय करायचे- मनुस्मृती की संविधान हे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकाचे प्रकाशन शेतकरी नेते राजाराम पाटील, इतिहास संशोधक वसंत कोळंबे, ॲड. दीपक गायकवाड, ॲड. गोपाळ शेळके, सुरेश सोनावणे, जनार्दन खंडागळे आदी मान्यवरांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला बबन गायकवाड, ॲड. कैलास मोरे, वेच्या गावित, रमेश खैरे, बागडे गुरुजी, यशवंत फाले, कुणाल ढोले आदींसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. सुरुवातीला धार्मिक विधी मनोहर ढोले यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन सुधाकर ढोले, सिद्धांत ढोले, अजय खंडागळे, नीलम ढोले, डॉ पूनम ढोले, प्रशांत साळुंखे, विजय कोंडिलकर यांनी केले.

निवडक

## वाढदिवसानिमित्त फळे वाटप

**पनवेल :** शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत व शिवसेना शहर प्रमुख कामोठे रामदास गोवारी यांच्या वाढदिवसानिमित्त भानगर येथील करुनेश्वर ओल्ड एज होम वृद्धाश्रमात फळांचे वाटप करण्यात आले. यावेळी दिपक निकम, प्रदीप ठाकूर, दिपक घरत, ज्ञानेश्वर बडे, प्रभाकर गोवारी, सूर्यकांत म्हसकर, शहर संघटक संतोष गोळे, उपशहर गणेश खांडगे, विभाग प्रमुख बबन गोगावले, शाखा प्रमुख एकनाथ गोवारी, युवासेना महानगर अधिकारी महेश भिसे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## अध्यक्षपदी प्रभाकर कांबळे

**पनवेल :** आरपीआयचे प्रभाकर कांबळे यांची पनवेल महानगरपालिका क्षेत्र अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. कोकण प्रदेशाध्यक्ष प्रकाश मोरे यांनी केलेल्या नियुक्तीचे पत्र रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांच्या हस्ते त्यांना देण्यात आले. प्रभाकर कांबळे यांच्या निवडीबद्दल त्यांच्यावर आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते तसेच मित्रपरिवार यांनी अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर कांबळे यांनी पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी काम करणार असल्याचे सांगितले.

## विद्यार्थ्यांना सायकल वाटप

**पनवेल :** माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला यांच्या वाढदिवसानिमित्ताने दोन जून रोजी पनवेल येथे वृक्ष लागवड करण्यात आली, तसेच जांभिवली वाडी येथील दोन विद्यार्थ्यांना सायकल वाटप करण्यात आले. माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला यांच्यातर्फे सईद मुल्ला यांच्या वाढदिवसानिमित्ताने जांभिवली वाडी येथील दोन विद्यार्थ्यांना सायकल वाटप करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला, डॉ. ययाती गांधी, त्यांचे मित्र परिवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## करंजाडेतून विवाहिता बेपत्ता

**पनवेल :** करंजाडे येथे राहणारी एक विवाहिता राहत्या घरातून कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. श्रीवणी दिपक मेहरोलिया (२०) असे या महिलेचे नाव असून, उंची ५ फूट ४ इंच, रंग गोरा, नाक सरळ, चेहरा उभट, केस काळे व लांब, डोळे काळे व मोठे अंगाने सडपातळ आहे. गळ्यात सोन्याचे मंगळसूत्र, हातात हिरव्या बांगड्या व अंगात पंजाबी ड्रेस आहे. तिला हिंदी व तेलगु भाषा अवगत आहे. या महिलेबाबत अधिक माहिती असल्यास पोलिसांशी संपर्क साधावा.

## अजिज शेख याचा सत्कार

**पनेवल :** शहरी प्रशासकीय सेवेतील अजिज शेख याची भारतीय प्रशासकीय सेवेत निवड झाल्याबद्दल विशेष सत्कार महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवा अधिकारी संघटनेमार्फत करण्यात आला. यावेळी संघटनेचे अध्यक्ष गणेश देशमुख, सचिव डॉ. प्रशांत रसाळ, कोषाध्यक्ष जमीर लेंगरेकर, सुधाकर देशमुख, देविदास टेकाळे, विजयकुमार म्हसाळ, प्रशांत रोडे, तृप्ती सांडभोर, मंगेश चितळे, श्रीम.अश्विनी वाघमळे, भालचंद्र बेहरे व अन्य मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रहिवाशांवर टांगती तलवार

**। पनवेल। विशेष प्रतिनिधी ।**

**पावसाळ्यामध्ये धोकादायक इमारती कोसळून घडलेल्या दुर्घटनांच्या पार्श्वभूमीवर पनवेल पालिकेकडून शहरातील धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण केले आहे. पालिकेच्या माध्यमातून जाहीर करण्यात आलेल्या धोकादायक इमारतीच्या यादीत ६२ इमारतींचा समावेश असून, या इमारतींमध्ये २७४ रहिवासी अद्यापही वास्तव्य करत असल्याची माहिती पालिकेकडून देण्यात आली आहे. या अतिधोकादायक इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांच्या डोक्यावर दुर्घटनेची टांगती तलवार कायम आहे.**



पालिकेने या इमारतींची वर्गवारी केली आहे. या वर्गवारीत धोकादायक आणि अतिधोकादायक असे दोन भाग केले असून, सर्वाधिक अतिधोकादायक आणि धोकादायक इमारती पनवेल आणि कळंबोली शहरात आहेत. या ६२ अतिधोकादायक इमारतीत २७४ कुटुंब वास्तव्यास आहेत. पनवेल शहरात जीर्ण व धोकादायक इमारती कित्येक वर्षांपासून उभ्या आहेत. पनवेल नगरपरिषदेच्या काळापासून या इमारती उभ्या आहेत. मध्यंतरी गणेश देशमुख पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त असताना धोकादायक

**■ पनवेलमध्ये ६२ इमारती अतिधोकादायक**

**■ इमारतीमधील २७४ जणांच्या जिवाशी खेळ**

इमारतीच्या पुनर्विकासाला गती मिळाली. पालिकेने धोकादायक इमारतीच्या आवारात कोणी प्रवेश करू नये, असे बॅनर लावले आहेत. मात्र, या धोकादायक इमारती पाडण्यासाठी पालिका प्रशासन पुढे का धजावत नाही, असा प्रश्न निर्माण झाला आहे. अतिधोकादायक इमारतीमध्ये खारघरमध्ये ३, कळंबोलीमध्ये १८०, कामोठ्यात २१ आणि पनवेल शहरात ७० कुटुंबं अतिधोकादायक इमारतीत वास्तव्यास आहेत. पालिकेने या इमारतींची यादी जाहीर केली आहे. काही इमारतींचे पाणी आणि वीज जोडणीदेखील बंद करण्यास सुरुवात केली आहे.

### राजकीय हस्तक्षेप?

**पालिकेने धोकादायक म्हणून घोषित केलेल्या इमारतींची वीज, पाणी बंद केल्यावर काही रहिवासी राजकीय नेत्यांचे वजन वापरून वीज, पाणी पूर्ववत करत आहेत. अशा इमारतीत दुर्दैवी घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण? अशाप्रकारे राजकीय हस्तक्षेप कितपत योग्य आहे, असा प्रश्न निर्माण झाला आहे.**

### धोकादायक इमारती पाडणार कोण?

**धोकादायक घोषित केलेल्या अनेक इमारती रिकाम्यादेखील झाल्या आहेत. या इमारती पडण्याची वाट बघायची की पालिका या इमारती स्वतः पाडेल, असा प्रश्न नागरिक विचारू लागले आहेत.**

# रस्त्याच्या वादातून सरपंचावर हल्ला

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कोल्हारे ग्रामपंचायतीमधील रस्त्याच्या बांधकामाबाबत नोटीस का बजावली यावरून चर्चा सुरू असताना वाद निर्माण झाला. त्यानंतर ग्रामपंचायत सदस्याकडून सरपंचांवर हल्ला करण्यात आला. त्या हल्ल्यात जखमी झालेले सरपंच खासगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. या हल्ल्याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, हल्ला करणाऱ्या सदस्यासह अन्य एकास पोलिसांनी अटक केली आहे.

कोल्हारे ग्रामपंचायतची तहकूब ग्रामसभा ३१ मे रोजी सकाळी ग्रामपंचायत कार्यालयातील पहिल्या मजल्यावर असलेल्या मीटिंग हॉल आयोजित करण्यात आली होती. ग्रामसभा संपल्यावर सरपंच महेश विरले हे त्यांच्या केबिनमध्ये पोहोचले. तेथे ग्रामपंचायत सदस्य विजय हजारे हे एका रस्त्याच्या कामाबद्दल चर्चा करण्यासाठी पोहोचले. रस्त्याच्या बांधकामाबद्दल नोटीस का काढल्या, असा प्रश्न विजय हजारे यांनी उपस्थित केला. त्यानंतर चर्चेतून सरपंच आणि सदस्य यांच्यात शाब्दिक वाद झाले आणि नंतर विजय हजारे यांनी सरपंच महेश विरले यांना शिवीगाळ केली. त्यावेळी विजय हजारे हे सरपंच विरले यांना जीवे ठार मारण्याची धमकी देत होते. त्यावेळी तुला खल्लास केल्याशिवाय सोडणार नाही असे बोलून विजय हजारे तसेच दिव्यांसू चंद्रकांत हजारे,चंद्रकांत रामचंद्र हजारे आणि रामचंद्र हजारे यांनी लाकडी दांडक्यानी सरपंच महेश विरले यांना मारहाण करणाऱ्या सुरुवात केली. त्यावेळी हा वाद मिटविण्यासाठी पुढे गेलेले काही व्यक्तीदेखील या मारहाणीत जखमी झाले. या मारहाणीत जखमी झालेले सरपंच महेश विरले यांना तात्काळ बदलापूर येथील खासगी रुग्णालयात उपचार करण्यासाठी दाखल केले.

जखमी सरपंच विरले यांच्यावर प्राथमिक उपचार झाल्यावर त्यांची तक्रार बदलापूर येथे रुग्णालयात जाऊन घेण्यात आली. त्यानंतर नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, फिर्यादी सरपंच महेश सुरेश विरले यांना मारहाण केल्याप्रकरणी ग्रामपंचायत सदस्य विजय रामचंद्र हजारे, दिव्यांसू चंद्रकांत हजारे,चंद्रकांत रामचंद्र हजारे आणि रामचंद्र हजारे यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. नेरळ पोलिसांनी प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्ह्यातील आरोपी विजय हजारे आणि चंद्रकांत हजारे यांना तात्काळ अटक केली आहे. तर या गुन्ह्यातील अन्य आरोपी रामचंद्र हजारे हे वयाने ८० वर्षांचे असल्याने त्यांना अटक करण्यात आली नाही, तर चौथा आरोपी १८ वर्षांखालील आहे.

# चाकूचा धाक दाखवून महिलेला लुटले

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**



रेवदंडा आगरकोट किल्ल्यात पुरातन सिद्धेश्वर मंदिराच्या बाजूला एकटीच राहात असलेल्या सत्तर वर्षीय विधवा महिलेस चाकूचा धाक दाखवून लुटल्याची घटना घडली आहे. मध्यरात्रीच्या सुमारास हेल्मेटधारी युवकाने पाणी पिण्याच्या बहाण्याने घरात घुसून चाकुचा धाक दाखवून, नायलॉन दोरीने हातपाय बांधून व तोंडात कापसाचा बोळा कोंबून सोन्याचे दागिने व रोख रकमेची जबरी चोरीची घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

रेश्मा रमेश पाटील या वयोवृद्ध विधवा महिला घरात एकट्याच राहतात. दि. १ जून रोजी रात्री बारा ते दीडच्या सुमारास अज्ञात हेल्मेटधारी मोटारसायकलस्वाराने घराचा दरवाजा ठोकावला व पिण्यासाठी पाणी मागितले. पाणी देण्यासाठी त्यांनी दरवाजा उघडला असता, तो घरात शिरला व चाकूचा धाक दाखवित त्यांचे हातपाय नायलॉनचे दोरीने बांधून तोंडात कापसाचा बोळा कोंबून त्यांच्या कानातील सोन्याच्या कुड्या जबरीने काढून घेतल्या. घरातील कपाटाच्या लॉकरमध्ये ठेवलेल्या डब्यातील सोन्याची बोरमाळ तसेच रोख रक्कम २५ हजार रूपये असा एकूण एक लाख पंचवीस हजार रूपये किमतीचा माल चोरी करून तो पळून गेला.

याबाबत रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी विनित चौधरी यांनी घटनास्थळी येऊन तपास केला असून, रेवदंडा पोलीस ठाण्याचे सहा.पोलीस निरीक्षक श्रीकांत किरविले अधिक तपास करत आहेत.

# उल्हास नदीच्या तीरावर जैवकचरा

### पर्यावरणप्रेमींकडून संताप व्यक्त

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातून वाहणाऱ्या उल्हास नदीवरील वाकस पुलाच्या तळाशी वाहत्या पाण्याच्या बाजूला जैवकचरा टाकला जात असल्याचे आढळून येत आहे. रात्रीच्या वेळी हा कचरा टाकण्यात येत असल्याचे बोलले जाते. रुग्णालय किंवा मेडिकल दुकाने यांच्याकडून हा जैव कचरा टाकला जात असल्याने पर्यावरणप्रेमींसह स्थानिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. नदीच्या वाहत्या पाण्याच्या बाजूला हा कचरा टाकण्यात येत असल्याने कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.



जैवकचरा ही मोठी समस्या असून, कर्जत तालुक्यातील रुग्णालयांनी आपला जैवकचरा गोळा करून ठेवायचा असतो आणि नंतर तो पनवेल येथे पाठवून द्यावा, असे शासनाचे आदेश आहेत. मात्र, कर्जत तालुक्यात जंगल भागात अनेक ठिकाणी जैवकचरा हा निर्मनुष्य ठिकाणी टाकण्यात येत असल्याचे आढळून आले आहे. त्यात आता नेरळ-कशेळे राज्यमार्ग रस्त्यावर वाकस पूल येथे जैवकचरा सातत्याने टाकला जात आहे. त्या ठिकाणावरून वाहणारी उल्हास नदी ही कर्जत तालुका आणि ठाणे जिल्ह्याची जीवनवाहिनी समजली जाते. असे असताना नदीच्या पाण्यालगत हा कचरा टाकण्यात येत असल्याने नदीच्या पाणीसाठ्यात वाढ झाल्यावर तो पाण्यातदेखील जाऊ शकतो. याचे गांभीर्य लक्षात घेऊन मॉर्निंग वॉकसाठी कशेळे रस्त्यावर जाणारे नेरळ येथील काही पर्यावरणप्रेमी यांच्याकडून नाराजी व्यक्त केली आहे.

नेरळ परिसरातील रुग्णालये किंवा मेडिकल दुकानांकडून हा जैवकचरा टाकला जात असल्याचे बोलले जात आहे. संबंधित प्रशासनाकडून हा जैवकचरा टाकणाऱ्यांवर कारवाईची मागणी करण्यात येत आहे. जैवकचरा ही मोठी समस्या बनली असून, प्रशासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार तो आरोग्य यंत्रणेने पनवेल येथे पाठवून देण्यासाठी कार्यवाही करावी, अशी मागणी केली आहे. उल्हास नदीमधील पाणी पिण्याचे असल्याचे लक्षात घेऊन आरोग्य यंत्रणेने नदीच्या परिसरात जैवकचरा टाकू नये, अशी अपेक्षा पर्यावरणप्रेमींसह स्थानिकांकडून व्यक्त व्यक्त होत आहे.

# हातमाग महोत्सवाला ९ जूनपर्यंत मुदतवाढ

**। अलिबाग । वार्ताहर ।**

कॉटन हँडलूम साडी महोत्सवाची ग्राहकांच्या आग्रहानुसार ९ जूनपर्यंत मुदत वाढवण्यात आली आहे. हातमाग कापडाचे भव्य प्रदर्शन व विक्री अलिबाग येथील पोस्ट ऑफिससमोरील सार्वजनिक वाचनालय, डोंगरे हॉल येथे सुरू आहे. नवीन हातमाग कपड्यांचे वेगवगळे प्रकार एकाच ठिकाणी पाहता व खरेदी करता येणार आहेत. तरी, ग्राहकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

प्रदर्शनाचा रविवारी (दि.९) शेवटचा दिवस असून, त्यामध्ये नवीन वेगवगळया प्रकारच्या ईरकल कॉटन साडी, इरकली सिल्क साडी, मधुराई कॉटन, खादी कॉटन, धारवाड साडी, सेमी पैठणी, खादी सिल्क, साडी प्रिंटेड, साडी वर्ड तसेच ड्रेस मटेरियल, खादी ड्रेस मटेरियल, लेडीज हँडबॅग, टॉप-पीस, कॉटन परकर, खादी ड्रेस मटेरियल, कॉटन गाऊन याशिवाय असंख्य प्रकारच्या मालावर २० टक्के सूट देण्यात आलेली आहे. सोलापूर हँडलूम कॉटन साडी व ड्रेस मटेरियल महोत्सव प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले आहे.

# सुपर मार्केट चालकांकडून लूट

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

श्रीवर्धन येथे सुपर मार्केट व मॉल मालकांनी सध्या खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांची वेगळ्या प्रकारे लूट चालवली असून, यामुळे ग्राहक त्रस्त झाले आहेत.



### सुट्टे पैसे नसल्याचे कारण देत ग्राहकांच्या माथी चॉकलेट

श्रीवर्धन येथे मॉल व सुपर मार्केटची संख्या जवळपास सहा इतकी आहे. ग्राहकांना आपल्या सुपर मार्केटमध्ये खरेदीसाठी आकर्षित करण्यासाठी मालकांकडून दर महिन्याला वेगवेगळ्या प्रकारच्या योजना आखल्या जातात. मोठ्या रकमेच्या खरेदीवर मिळणारी बक्षिसे व ठरावीक रकमेच्या खरेदीवर मिळणारी सूट तसेच सेल्फ सर्व्हिस या कारणाने ग्राहक सुपर मार्केटची पायरी चढतात. सध्या सुपर मार्केट चालकांकडून खरेदीकरिता आलेल्या ग्राहकांची वेगळ्या प्रकारे लूट करण्याच्या घटना समोर येत आहेत. ग्राहकानी ऐंशी अथवा नव्वद रुपयांची खरेदी केल्यावर शंभर रुपयाची नोट काऊंटरवर ठेवल्यास सुट्टे पैसे नसल्याचे कारण देत उर्वरित रकमेचे बिस्कीट पुडे किंवा चॉकलेट्स ग्राहकांच्या माथी मारली जात आहेत. अनेकदा ग्राहकांच्या माथी मारण्यात आलेली चॉकलेट व बिस्कीट पुडे ब्रॅन्डेड कंपनीचे नसल्याचे आढळून आले आहे.

# मान्सूनपूर्व कामासाठी नियंत्रण कक्ष कार्यान्वित

### तहसीलदारांनी घेतला पूरस्थितीचा आढावा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील दरडग्रस्त गावे, धरणे, संभाव्य पूरस्थिती यांचा आढावा कर्जत तहसीलदार यांनी घेतला. त्यावेळी कर्जत तालुक्यातील सर्व विभागांचे अधिकारी या आढावा बैठकीला उपस्थित होते. दरम्यान, कर्जत तालुक्यात पूर नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला असून, तालुक्याच्या ठिकाणी तसेच गावपातळीपर्यंत हे नियंत्रण कक्ष कार्यान्वित झाले आहेत.

यावर्षीच्या पावसाळ्यात येणाऱ्या समस्यांवर तात्काळ उपाययोजना करण्यासाठी मान्सूनपूर्व आढावा घेतात आला. मान्सूनपूर्व अंतर्गत तालुक्यातील दरडप्रवण, धरणक्षेत्र, तलाव, धबधबे आदी ठिकाणी उद्भवणारी



परिस्थिती आणि त्यावर करावयाच्या उपाययोजनांबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. मान्सूनपूर्व तयारीच्या अनुषंगाने तहसीलदार तथा अध्यक्ष तालुका आपत्ती व्यवस्थापन समिती कर्जत डॉ. शीतल रसाळ यांच्या अध्यक्षतेखाली कर्जत प्रशासकीय भवन येथे तहसीलदार कार्यालयात घेण्यात आला. कर्जत येथे तालुक्यातील सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालय प्रमुख यावेळी उपस्थित होते. या बैठकीस निवासी नायब तहसीलदार सचिन राऊत, बी.एस. कटकदौड, सहाय्यक निबंधक कर्जत, डी. जी. जोंधळे, प्रा.कृ.सं. केंद्र कर्जत, एस.आर. पाल, सहा. अभियंता, महावितरणचे प्रभाकर बोरकर, जीवन प्राधिकरणाचे दिपक अडवाणी, कृषी विभागाचे मंगेश पालांडे, जलसंधारणाचे अक्षय भोसले, पाटबंधारे विभागाचे निलेश देशमुख, कर्जत नगरपरिषदेचे बापू बहिरम आदी उपस्थित होते.

तरी कर्जत तालुक्यात नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने कोणतीही आपत्ती किंवा पुर, दरड कोसळणे इत्यादी घटना घडल्यास नागरिकांनी नियंत्रण कक्षातील -०२१४८-२२२०३७ तसेच भ्रमणध्वनी क्रमांक-९३७३९२२९०९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन तहसीलदार डॉ. शीतल रसाळ यांनी केले होते.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय २५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६
- अंकुर नर्सरी, वाडगाव फाटा, अलिबाग सिझनल सेल! सर्व प्रकारच्या फळझाडे आणि फूलझाडे वर भरपूर डिस्काऊंट. १५ जूनपर्यंत झाडे बुक केल्यास अधिक डिस्काऊंट. संपर्क : ९४२३८९०२९५ (शुक्रवार ते सोमवार)
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १. रिसेप्शन, २. लोकल जेवण बनवण्यासाठी हॉटेल लेडीज स्टाफची आवश्यकता आहे. शिफ्ट टाइमिंग दुपारी २ ते रात्री ११, २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा. (व्हॉटसॲप वर मेसेज करावा.) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५
- Autocad draftsman required in architectural firm. Location :Alibag Comtact no:9970391697
- अगस्त्या फाऊंडेशन या नामांकित समाजसेवी संस्थेच्या अलिबागमधील शाखेत Instructor या पदासाठी मुलाखती चालू आहेत. पात्रता पदवीधर ( BSC/MSC/B.ed/D.ed/Be) निवड प्रक्रिया- लेखी परिक्षा व मुलाखत. इच्छुक उमेदवारांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा. रोहन म्हात्रे- ७९७२२१९३६२/प्रकाश हांडे-९४२३०१६९३२
- B.A, B.ed, D.ed. B.sc. BP.ed शिक्षक/शिक्षिका पाहिजेत. पगार अनुभवानुसार आपला बायोडाटा ८३९०९०९४७० या नंबरवर व्हॉट्सअप करा. तसेच अलिबागसाठी ऑफिससाठी अकौंटस क्लार्क पाहिजेत.
- अलिबाग एस.टी. स्टँडसमोर रेडी क्लासरूम इन्फ्रास्ट्रक्चर हॉबी क्लासेस, स्कील डेव्हलपमेंट व इतर कोणत्याही शैक्षणिक वापरासाठी उपलब्ध आहे. संपर्क : ८३९०९०९४७०
- पहिली ते पाचवी क्लासेस व पाळणाघर श्रीबाग नं.-२, चेंढरे, अलिबाग. संपर्क- ९८२३९२०४०३, ८१४९६६९२४६
- अलिबाग शहरात मध्यवर्ती ठिकाणी ३५० स्क्वे.फूट. गाळा भाड्याने देणे आहे. (बीच रोड, जुना नगरपालिकेजवळ, संपर्क - ९४२११६३१२४
- घरकाम व मुलांना सांभाळणे साठी बाई हवी पंतनगर अलिबाग येथे. पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ८.००ते ६ संपर्क-९८६७२१५४९५/८०९७२०५९३९
- अलिबाग शहराच्या जवळ N.A.Plot आहेत. भातशेती वरकस जमिन अलिबाग रोहा रोड वर उपलब्ध. सनस्टोन रॉयल इस्टेट अलिबाग-बायपास रोड. ८६६९००६९०२/९२७०८८८८०३

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

# १२२ वर्षांनंतरही रुग्णालय दिमाखात

### माथेरानकरांसाठी ठरतेय नवसंजीवनी

**। माथेरान । वार्ताहर ।**

**सुप्रसिद्ध पर्यटनस्थळ माथेरानमध्ये स्थानिक आणि पर्यटकांच्या आरोग्य सेवेसाठी बैरामजी जिजीभाई रुग्णालयाची निर्मिती करण्यात आली. या रुग्णालयाला ३ जून रोजी १२२ वर्षे पूर्ण झाली. इतक्या वर्षांनंतरही या रुग्णालयाची इमारत येथे दिमाखात उभी आहे. एकमेव रुग्णालय असलेल्या या रुग्णालयात आजही चांगले उपचार दिले जात आहेत.**

तत्कालीन सी.एस.आय. शेठ बैरामजी जिजीभाई यांच्या स्मरणार्थ माथेरान येथील गरीब लोकांच्या सेवेसाठी या रुग्णालयाची स्थापना करण्यात



आली होती. सन १८७२ च्या ट्रस्ट सेटलमेंटमधून शेठ रुस्तमजी बैरामजी जिजीभाई यांनी रुग्णालयाची इमारत बांधण्यासाठी आणि ती सज्ज करण्यासाठी त्याकाळी १३,१०० इतकी रक्कम दिली होती. या रकमेतून सुसज्ज अशी नियोजनबद्ध इमारत बांधून २३ जून १९०२ साली येथे रुग्णालय सुरू करण्यात आले. या इमारतीचा ठराव क्रमांक ५८६५ जी.डी. हा १२ ऑक्टोबर १९०१ रोजी पारित करण्यात आला होता. त्याची साक्ष आजही रुग्णालयाच्या भिंतीवर लावण्यात आलेला फलक देत आहे. या इमारतीला ३० फूट उंची देऊन वरच्या बाजूला पूर्ण झडपा काढल्या गेल्या आहेत. त्यामुळे येथे हवा खेळती राहते, त्यामुळे रुग्णाला उकाड्याचा त्रास जाणवत नाही. तसेच पावसाळ्यात पाणी आत येऊ नये, अशा प्रकारच्या डबल झडपा येथे लावल्या आहेत. तसेच हिवाळ्यात थंडी लागू नये यासाठी येथे काळ्या दगड्याच्या भिंती उभारण्यात आल्या आहेत. रुग्णालयात दोन मोठ्या खोल्या असून, रुग्णांसाठी आठ खाटांची सोय आहे. यातील चार खाटा या महिला आणि लहान मुलांकरिता असून, चार खाटा या पुरुष रुग्णांसाठी राखीव आहेत.

### धूळ खात पडलेला भाग वापरात आणा

**येथील काही बंगलेधारकांनी आपल्या स्वखर्चातून रुग्णालयाला एक्स-रे मशीन, प्रयोगशाळेतील साहित्य भेट म्हणून दिले आहे. ते धूळ खात पडले आहेत. जर हे साहित्य रुग्णालयाच्या वापरात आणल्यास रुग्णांना याचा मोठा फायदा होऊ शकतो. त्यासाठी पालिकेच्या मानसिकतेची गरज असल्याचे सुज्ञ नागरिकांचे मत आहे.**

बैरामजी जिजीभाई रुग्णालय माथेरान गिरीस्थान नगरपालिकेच्या अधिपत्याखाली असून, स्थानिक नागरिकांसह पर्यटकांवरही येथे उपचार दिले जातात. अनेकदा माथेरानमध्ये आलेले पर्यटक फिरताना कड्यावरून अथवा घोड्यावरून पडून जखमी होतात, त्यांना उपचारासाठी याच रुग्णालय आणले जाते. त्यामुळे याठिकाणी अद्ययावत सुविधा देण्याची मागणी होत आहे.

> बी.जे. रुग्णालय हे माथेरानकरांसाठी नवसंजीवनी देणारे आहे. येथील एकमेव रुग्णालय असल्याने रुग्ण याच दवाखान्यात उपचारासाठी येतात. कोविडमध्ये या रुग्णालयाने माथेरान सावरले आहे. येथे कमी पैशात उपचार होतात. मात्र, ब्रिटिशकालीन या रुग्णालयाचा काही भाग हा वापराविना आहे. तो वापरात आला तर हे रुग्णालय एक अत्याधुनिक रुग्णालय होऊ शकते.
>
> - दीपक जाधव, माजी नगरसेवक, माथेरान

# बिरवाडीकर वाहतूक कोंडीने हैराण

## वाहतूक नियोजनात ग्रामपंचायत हतबल



**। महाड । वार्ताहर ।**

महाड औद्योगिक वसाहतीमधील बिरवाडी गावात असलेली वाहतूक कोंडीची समस्या आजही कायम आहे. त्यामुळे वाहन चालक, शालेय विद्यार्थी, महिला आणि वयोवृद्ध नागरिकांना याचा मोठा त्रास होत आहे. बिरवाडी ग्रामपंचायत आणि पोलीस प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे, असा नागरिकांचा आरोप आहे. दरम्यान, या सातत्याने होणाऱ्या वाहतूक कोंडीने नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

महाड औद्योगिक क्षेत्राचा विस्तार दिवसेंदिवस वाढत चालला आहे. एमआयडीसीचा बहुतांश भाग हा बिरवाडी ग्रामपंचायत अंतर्गत येत असल्याने बिरवाडी गावाचा विकास आणि विस्तार दिवसेंदिवस वाढत चालला आहे. शिवाय महाड औद्योगिक परिसरातील वाळण, वरंध विभागातील नागरिकांना बिरवाडी ही जवळची बाजारपेठ असल्याने याठिकाणी खरेदीसाठी मोठी गर्दी असते. महाड औद्योगिक वसाहतीमधील निरवाडी श्रीमंत ग्रामपंचायत म्हणून ओळखले जाते. मात्र, तरीदेखील योग्य नियोजन होत नसल्याने वाहतूक कोंडीसारख्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. दिवसेंदिवस वाढती लोकसंख्या आणि इमारतींचे बांधकाम याबाबत परवाने देत असताना ग्रामपंचायतीने वाहन पार्किंग, घनकचरा व्यवस्थापन आदीबाबत संबंधित विकासकांना सूचना देणे आवश्यक आहे. मात्र, नियोजनाचा विचार न करताच परवाने दिले जात असल्याने इमारतींची संख्यादेखील दिवसेंदिवस वाढत चालली आहे. बिरवाडीमधील वाढता विस्तार आणि वाढती लोकसंख्या यामुळे नियोजनबद्ध आराखडा मात्र केला जात नसल्याने नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे विविध समस्यांबरोबर बिरवाडीमध्ये वाहतूक कोंडीची मोठी समस्या निर्माण झाली आहे. अरुंद रस्ते आणि दुकानांच्या समोरील वाढलेल्या शेड यांनी अधिक अरुंद असलेला रस्ता वाहतुकीस अपुरा पडत आहे. बिरवाडीमधील मुख्य बाजारपेठदेखील अरुंद होत चालली आहे. याचा त्रास बाजारपेठेत येणाऱ्या नागरिकांना होत आहे.

महाड औद्योगिक पोलीस ठाण्याकडून बिरवाडीमध्ये पोलीस चौकी उभी केली असली तरी या ठिकाणी पोलीस कायमस्वरूपी नसल्याने वाहन चालकांची मनमानी वाढत चालली आहे. बिरवाडी मध्ये मुख्य रस्त्यावर दोन्ही बाजूने वाहने पार्क केली जातात, यामुळे अवजड वाहने तसेच एसटी बसेसना मोठा अडथळा निर्माण होतो. अशावेळी वाहतूक कोंडीला नागरिकांना कायम सामोरे जावे लागत आहे. याठिकाणी असलेल्या मिनिडोर रिक्षा चालकदेखील आपल्या रिक्षा दुतर्फा लावून बसत आहेत. बिरवाडीमध्ये असलेल्या विद्यालयातील विद्यार्थ्यांनादेखील या वाहतूक कोंडीतून मार्ग काढताना त्रास होतो. मात्र, तरीदेखील बिरवाडी ग्रामपंचायतीने याबाबतीत कधीच ठोस पावले उचललेली नाही. स्थानिक नागरिक आणि लोकप्रतिनिधींच्या दबावामुळे उघडपणे प्रतिक्रिया देण्यास कोणीही नागरिक तयार होत नाहीत. मात्र, ग्रामपंचायतीच्या भोंगळ कारभारावर नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

## शेती मशागतीच्या कामांना वेग

**अलिबाग :** तालुक्यातील चौल परिसरात खरीपापूर्वीची शेती मशागतीची कामे करण्यात बळीराजा मग्न असल्याचे चित्र दिसून येत आहे. बांधबंदिस्ती, राब जाळणे आदी कामे अंतिम टप्प्यात आली असून, शेतकरी मान्सूनची वाट पाहात असल्याचे चित्र आहे.

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५



# अहिल्यादेवी होळकरांची जयंती साजरी

**। म्हसळा । वार्ताहर ।**

म्हसळा येथील केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयात पुण्यश्लोक अहित्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दि जयंती शुक्रवारी (दि. ३१) साजरी करण्यात आली.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष संजय खांबेटे, खजिनदार सुनील उमरोटकर, सदस्य पांडुरंग पाटील, मा. सभापती महादेव पाटील, निवृत्त वन अधिकारी बाळकृष्ण गोरनाक, कृषी पर्यवेक्षक सुजय कुसळकर, विनोद सोनावणे, के.पी. कुरकुरे, सुशीलकुमार गाडगे, धनंजय सरनाईक, नरेश जामकर, परेश नाक्ती, सायली चोगले, प्राची मेंदडकर आदी उपस्थित होते.

याप्रसंगी ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये सती साध्वी देवी अहिल्या, लोकमाता, कर्मयोगिनी अहिल्याबाई होळकर, राजयोगिनी अहिल्याबाई होळकर, पुण्य. अहिल्यादेवी होळकर, भारतीय स्त्रीरत्न, अहिल्याबाई होळकर, महाराणी अहिल्याबाई होळकर अशी विविध पुस्तके ठेवण्यात आली होती. संस्था राबवित आसलेल्या विविध कार्यक्रमांचे उपस्थितांनी कौतुक केले.

## राकेश खराडे जीवनगौरवने सन्मानित

**। रसायनी । वार्ताहर ।**

किल्ले पर्यटन सेवा संशोधन केंद्र, अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद सिंधुदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय बहुभाषिक साहित्य कला पर्यटन सामाजिक संमेलन व सन्मान सोहळा मालवण येथील मामा वरेरकर नाट्यगृहात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन शिक्षणमहर्षी डॉ.दिपक परब, मानसोपचार तज्ज्ञ हेमंत कोळंबकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात पत्रकारिता क्षेत्रात कामगिरी करणाऱ्या रसायनीतील पत्रकार राकेश खराडे यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# क्लासेसला न जाता गुणवंत ठरलेल्यांचा होणार गौरव

## सहज सेवा फाऊंडेशनचा स्तुत्य उपक्रम

**। खोपोली । वार्ताहर ।**

घरची परिस्थिती बेताची असून, जिद्दीने शिक्षण घेऊन भरघोस विद्यार्थी व त्यांचे पालक यांचे विशेष कौतुक होत नाही. सहज सेवेकडे अनेक वेळा ही खंत समाजातील अनेक माध्यमांनी व्यक्त केलेली आहे. या बाबीचा विचार करता कर्जत व खालापूर तालुक्यांतील दहावी व बारावीच्या परीक्षेत ९० व त्याहून अधिक टक्के मिळवून उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थी व पालक यांचे त्यांच्या घरी जाऊन सहज सेवा फाऊंडेशनच्या माध्यमातून सन्मान करण्यात येणार आहे. फाऊंडेशनचे तालुकाप्रमुख मोहन केदार यांच्या वाढदिवसानिमित्त या उपक्रमाचा शुभारंभ करण्याचा मानस संस्थेने व्यक्त केलेला आहे.

सहज सेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे, कार्याध्यक्षा माधुरी गुजराथी, उपाध्यक्षा इशीका शेलार, सचिव अखिलेश पाटील, नम्रता परदेशी, संतोष गायकर, बनिता साह, निलम पाटील, जयश्री कुलकर्णी, मोहन केदार, राजेंद्र फक्के, नरेंद्र हर्डीकर, गणेश राक्षे, दिवेश राठोड, उबेद पटेल, अशोक ठकेकर, तुषार अगरवाल, आश्पाक लोगडे, उपक्रम प्रमुख समीर साठे तसेच सहज युवाचे सागरिका जांभळे, सोहम ढोकळे, साहिल जांभळे, संचीता पाटील यासाठी मेहनत घेत आहेत. विद्यार्थ्यांची माहिती देण्यासाठी ८७८८११०७३९/७८८७३७०००८ या क्रमांकावर संपर्क साधावा , असे आवाहन करण्यात आले आहे.

## एमपीएसएसमध्ये यश जाधव प्रथम

**। रोहा । प्रतिनिधी ।**

रोहातालुक्यातील आंबेवाडी-कोलाड येथील इंग्रजी माध्यमाच्या एमपीएसएस स्कूलमध्ये यश जाधव याने ९१.४० टक्के गुण संपादित करून स्कूलमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा बहुमान पटकावला आहे. तर, द्वितीय क्र. गौरव धामणसे ९०.२९ टक्के, तृतीय श्लोक जांभळे ९० टक्के, चतुर्थ आयुष मोरे व कनिष्क मोरे ९७.२० टक्के, तर पाचवा क्रमांक आर्या धनवी ८७ टक्के गुण मिळवत प्राप्त केला.

# उसरोली येथे महिला मेळावा



**। कोर्लई । वार्ताहर ।**

जगदगुरुश्रीस्वामी नरेंद्र महाराज संप्रदायातर्फे मुरुड तालुक्यातील उसरोली फाटा येथील पंचक्रोशी आगरी समाजाच्या हॉलमध्ये जिल्हास्तरीय महिला मेळावा संपन्न झाला. मेळाव्याला संपूर्ण जिल्ह्यातून भाविक व भक्तगण विशेष करून महिला भक्त गणांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

जगदगुरु नरेंद्राचार्यजी महाराज आणि परमपूज्य कानिफनाथ महाराज यांच्या कृपाशीर्वादाने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.त्याचाच भाग तालुक्यातील उसरोली फाटा येथील पंचक्रोशी आगरी समाजाच्या हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमाला साधना शिंदे, सिमाताई पाटील, वसंत राऊत, सुधीर पुलेकर, अंजली जगताप, भरत थिठे, चंद्रकांत लोणशीकर यांसह सर्व तालुका अध्यक्ष व महिला अध्यक्षा यांसह महिला भाविक भक्तगण मोठ्या संख्येने सहभागी उपस्थित होते.

# गणेश तेलंगे यांचा सेवानिवृत्ती कार्यक्रम



**। म्हसळा । वार्ताहर ।**

चाळीस वर्षांच्या शासकीय सेवेनंतर नियत वयोमानानुसार ३१ मे रोजी सेवानिवृत्त झालेले म्हसळा तहसील कार्यालयातील निवासी नायब तहसीलदार गणेश तेलंगे यांचा सेवानिवृत्ती कार्यक्रम न्यू इंग्लिश स्कूल आणि जुनिअर कॉलेज म्हसळाच्या सभागृहात संपन्न झाला.

यावेळी तहसीलदार घारे यांनी सांगितले की, तेलंगे यांनी तलाठी ते नायब तहसीलदारपदापर्यंत घेतलेली झेप ही निश्चितपणे अभिमानास्पद असून, त्यांचा हा आदर्श नवीन पिढीला घेण्यासारखा आहे. यावेळी त्यांनी तेलंगे दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तहसीलदार समीर घारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमांस स्कूल कमिटी अध्यक्ष समीर बनकर, निवडणूक नायब तहसीलदार संध्या अंबुर्ले, डॉ. खान, नगरसेविका राखी करंबे, संतोष जाधव, गणेश तेलंगे त्यांचे कुटुंब, सचिन धोंडगे, सर्व तलाठी, महसूल कर्मचारी, अजय जाधव, गोरखनाथ माने, कोतवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

## नुरा शेख यांचा सेवापूर्ती सोहळा

**उरण :** श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज जासई विद्यालयाचे शिक्षक नुरा शेख यांचा सेवापूर्ती कार्यक्रम जासई येथे महाविद्यालयात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री कामगार नेते सुरेश पाटील यांच्या हस्ते त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांना सेवापूर्तीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

## शीतपेयांना मागणी

**। अलिबाग । वार्ताहर ।**

वातावरणातील वाढत्या उष्णतेमुळे अंगाची लाही लाही होत आहे. अशातच शरीराला थंडावा मिळावा म्हणून सध्या रसवंती गृह, विविध प्रकारच्या सरबतांच्या गाड्या, ताक, लस्सीची दुकाने, नारळपाण्याला नागरिकांची पसंती मिळत असून, याठिकाणी खरेदीसाठी गर्दी होत असल्याचे पाहावयास मिळत आहे. त्यामुळे शीतपेय विक्री करणाऱ्या व्यावसायिकांचा धंदा तेजीत आहे.

# फणसाड-सुपेगाव रस्ता खड्ड्यातच

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड-रोहा प्रवासात जवळचा मार्ग (शॉर्टकट) असलेल्या मुरुड तालुक्यातील फणसाड-सुपेगाव मार्गावर काही ठिकाणी आदिवासीवाडी सुमरादेवी ते सुपेगावच्या पुढील अवघड वळणापर्यंत अनेक ठिकाणी मागील पावसाळ्यापासूनच खड्डे पडलेले असल्याने अपघाताला निमंत्रण ठरत आहे. याकडे संबंधित बांधकाम खात्याचे दुर्लक्ष होत असल्याबाबत पर्यटक, प्रवासी, वाहनचालक व नागरिकांतून नाराजी व्यक्त होत असून, साईडपट्ट्यादेखील साफ करण्याची मागणी केली जात आहे.

गेले कित्येक वर्षे हा सुपेगाव मार्गावर रस्ता न बनविल्याने अद्याप खड्ड्यातच आहे. मुरुड-जंजिरा पर्यटनात रत्नागिरी, पुणे, कोल्हापूर अन्य ठिकाणाहून काशिद किनारा, फणसाड अभयारण्य, मुरुड-जंजिरा किल्ला पाहण्यासाठी रोहा-सुपेगावमार्गे मुरुड रस्ता जवळचा असल्याने या रस्त्यावर वाहनांची वाढती वर्दळ असते. गेल्या कित्येक वर्षांपासून या रस्त्यावर बऱ्याच ठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य असून, वाहन चालकांना आपली वाहने चालवताना कसरत करावी लागते आहे. खड्ड्यांमुळे या रस्त्यावर वेळप्रसंगी अपघाताची शक्यताही नाकारता येत नाही.

शासनाच्या संबंधित बांधकाम विभागाने यात लक्ष पुरवून सुपेगाव मार्गावर रस्त्यावर असलेले खड्डे बुजविण्यात योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी पर्यटक, प्रवासी, वाहनचालक व नागरिकांतून जोर धरीत आहे.

# जिजामाता शिक्षण संस्थेच्या प्रांगणात वृक्षारोपण



**। म्हसळा । वार्ताहर ।**

दिवसेंदिवस उष्णतेची लाट आणि सध्याचा ग्लोबल वॉर्मिंगचा इशारा पाहता निसर्गाचे संवर्धन करण्यासाठी एकमेव उपाय म्हणजे वृक्ष लागवड काळाची गरज बनली आहे. जमिनीमध्ये पाण्याचे प्रमाण कमी झाले असल्याने त्याचे संतुलन राखण्यासाठी जास्तीत जास्त वृक्षलागवड केली पाहिजे, या स्तुत्य हेतूने रायगडभूषण कृष्णा महाडिक यांच्या प्रयत्नाने पंजाब येथील उद्योगपती विजय नागरथ, जिजामाता शिक्षण संस्थाप्रमुख महादेवराव पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत जिजामाता शिक्षण संस्थेच्या प्रांगणात वृक्षलागवड करण्यात आली.

या वृक्षांचे संवर्धन करण्यासाठी कृष्णा महाडिक यांनी शाळा शिक्षक आणि विद्यार्थी वर्गाने योग्य ती काळजी घेऊन निसर्गाचे संवर्धन करण्यासाठी मोलाचे सहकार्य करावे, असे आवाहन केले. आयोजित वृक्षलागवड कार्यक्रमाला मुख्याध्यापक संदीप कांबळेकर, बनोटी प्राथमिक शाळा मुख्याध्यापक जयसिंग बेटकर, मेंदडी हायस्कूल मुख्याध्यापक प्रमोद चालके, रुपेश कांबळे, मेघशाम लोणशिकर, वैभव सुतार, भावेश घाणेकर, लक्ष्मण गाणेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सहा महिन्यांपूर्वी कृष्णा महाडिक यांच्या प्रयत्नाने विजय नागरथ यांच्यासारख्या अनेक मान्यवरांच्या आर्थिक सहकार्याने जिजामाता शिक्षण संस्थेची उभारणी करण्यात आली आहे.

### जाहीर सुचना

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे उसरोली, ता. मुरूड, जि. रायगड, येथील खाली नमुद केलेल्या वर्णनाची शेतजमिन मिळकत, श्री. बाळाराम महादू पाटील व सौ. ज्योती बाळाराम पाटील, राहणार आशय बंगला, गणपती मंदिरापुढे, मोहपाडा, चांभरली, ता. खालापूर, जि. रायगड यांच्या मालकीची असून, सदरील शेतजमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान पुर्ण झाली आहेत व माझे अशिलानी सदर शेतजमिन मिळकत खरेदी करण्याचे कायम केले आहे. सदर शेतजमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी, ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तहेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तहेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| उसरोली ता. मुरूड | ४०८ | ०-५४-६०<br>०-०४-३० पो.ख.<br>०-५८-९० एकूण | १०-७२ |

सदरील शेतजमिन मिळकतीपैकी ०-३०-०० (हे.आर) शेतजमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : ०२/०५/२०२४.

सही/
(ॲड. संजय म. भगत)
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

### जाहीर नोटीस

आमचे अशिल यांचेद्वारे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की खालील वर्णन केलेली जमीन मिळकत ही विद्यमान मालक १. ज्योत्स्ना अशोक थोरात २. वैशाली रमाकांत रोकडे ३. निता रविंद्र थोरात यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

**मौजे. बेलवडे बुद्रुक ता. पेण जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मौजे | स.न. | हि.न. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| बेलवडे बुद्रुक | २९ | ... | ००.५३.७०<br>पो.ख. ००.०५.५०<br>एकूण ००.५९.२० | ९.२३ |

वरील वर्णनाच्या जमीन मिळकतीबाबत इतर कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदलाबदल अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहरास हरकत असल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थानी आपली हरकत पूराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वत:हून हजर होऊन आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसात कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचा अशिलांच्या लाभात सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभात होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यास येऊन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही हरकत घेतल्यास ती हरकत आमच्यावर आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

दि. ०२.०६.२०२४
ठिकाण : पेण

ॲड. उदय प्रकाश मोकल
पत्ता : मु. पो. चिरनेर
ता. उरण जि. रायगड
पिन कोड : ४१०२०६
मोबा. ९०८२९११९१३

### सार्वजनिक नोटिस

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आमच्या क्लायंटने **(१) मनीष प्रकाश शिर्के (२) पंकज पृथ्वीराज राजेशिर्के (३) मनोज लक्ष्मण थुले (४) मिनार मनोहर पाटील (५) मिथिलेश मनोहर पाटील (६) सूरज जग्गानाथ व्यवहारे (७) कर्मवीर शिवगोविंद मिश्रा आणि (८) रणबीर शिवगोविंद मिश्रा** यांच्याकडून खरेदी आणि संपादन करण्यासाठी वाटाघाटी केली आहे. ते सर्व भारतीय रहिवासी क्रमांक (१) मनीष प्रकाश शिर्के रेल्वे स्टेशन इंदापूर रायगड महाराष्ट्र ४०२ ११२ क्रमांक (२) एस/ओ पृथ्वीराज राजेशिर्के प्लॉट नं. येथे त्यांचा पत्ता असलेला प्लॉट नं.डी–९७ सेक्टर २० फ्लॅट क्र. २०२ २रा मजला नवी मुंबई ठाणे महाराष्ट्र पिन ४०० ७०६ नंबर (३) त्याचा पत्ता जी१/३ तापी दर्शन सोसायटी–२ सुरत भरीमाता कॉसवे रोड सुरत सिटी सुरत ३९५ ००४ नंबर (४) त्यांचा पत्ता गौरीहर सदन विठ्ठल वाडी दत्त मंदिराजवळ नावडे पाली बीके येथे रायगड येथील, महाराष्ट्र पिन ४१० २०६ क्रमांक (५) त्यांचा पत्ता घर क्रमांक ९५/ए गौरीहर सदन दत्त मंदिराजवळ नावडे पोस्ट येथील बीके रायगड महाराष्ट्र पिन ४१० २२१ येथे असलेला क्रमांक (६) त्यांचा पत्ता कामठा उस्मानाबाद येथील महाराष्ट्र ४१३ ६०१ क्रमांक (७) त्यांचा पत्ता खोली क्रमांक २१० कॅनॉल रोड वाकडाई नगर उतेखोल पोस्ट येथील माणगाव रायगड महाराष्ट्र ४०२ १०४ असलेला आणि क्रमांक (८) त्यांचा पत्ता वाकडई नगर केनाल माणगाव रायगड महाराष्ट्र पिन ४०२ १०४ येथे आहे. **(''मालक'')** त्यांचे सर्व संबंधित अविभाजित शेअर हक्काचे शीर्षक आणि प्लॉटमधील स्वारस्य येथे लिहिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक विशेषत: वर्णन केले आहे.

कोणताही दावा असलेली कोणतीही व्यक्ती प्लॉटच्या किंवा विरुद्ध किंवा विरुद्ध किंवा विक्री हस्तांतरण असाइनमेंट एक्सचेंजच्या मार्गाने बांधलेल्या आणि/ किंवा त्यावर बांधल्या जाणाऱ्या कोणत्याही परिसर/ संरचना/क्षेत्र/इमारतीसह प्लॉट किंवा त्याचा कोणताही भाग किंवा भाग यांच्या संदर्भात योग्य लाभ किंवा व्याजाची मागणी करते, हक्काचे व्याज शेअर भाडेपट्टा उप–भाडेपट्टा भाडेकरार उप–भाडेपट्टा परवाना गहाणखत भेटवस्तू ग्रहण शुल्क बोजा व्यवसाय करार ट्रस्ट मेंटेनन्स एजमेंट प्री–एम्प्शन वारसाहक्क वसीयत ताबा विकास हक्क, हक्क आरक्षण करार लिस पेंडन्स कौटुंबिक व्यवस्था सेटलमेंट डिक्री किंवा कायदेशीर भागीदारीच्या कोणत्याही न्यायालयाचा आदेश किंवा आदेश अन्यथा कोणत्याही स्वरूपाची किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारची माहिती येथे प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांच्या आत आमच्या कार्यालयात वैध/प्रभावी दस्तऐवजांच्या प्रमाणित छायाप्रतींद्वारे लिखित स्वरूपात कळवणे आवश्यक आहे, अन्यथा आमच्या क्लायंटच्या नावे प्लॉटची विक्री कन्व्हेयन्स आणि हस्तांतरण अशा दाव्याचा संदर्भ न घेता पूर्ण केले जाईल आणि जर असेल तर ते माफ केले जाईल.

**येथे संदर्भित वेळापत्रक:**

**(प्लॉटचे वर्णन)**

जमिनीचा तो सर्व तुकडा किंवा पार्सल : माणगाव रायगड पिन ४०२ १०४ येथे माणगाव नगरपरिषदेच्या हद्दीतील नानोरे (५५४६४१) तालुका आणि नोंदणी उपजिल्हा माणगाव व जिल्हा रायगड या महसुली गावातील माणगाव नगरपरिषदेच्या हद्दीतील सर्वेक्षण क्रमांक: (।) १२७/५(पी) आणि बेअरिंग पीयु–आयडी क्रमांक १९९३४५३६७४२, मोजणारा २४,००० चौरस मीटर आणि (।।) १२८/१/अे/३(पी) आणि बेअरिंग पीयु–आयडी क्रमांक २५२१३३७७२७० मोजणारा २२,९०० चौरस मीटर, एकूण ४६,९०० चौ.मी. अर्थात ५,०४,८२७.४० चौ.फू.

मुंबई, दिनांक ३ जुन, २०२४ रोजी

द्वारा **एस.शाह ॲण्ड असोसिएट्स**
एसडी/–
(शशांक शाह)
भागीदार
**अधिवक्ता आणि वकील**
(एलडी शाह ॲण्ड कंपनीची सहयोगी फर्म)

पेटीट फ्लेर, ८५, रानाडे रोड,
शिवाजी पार्क, दादर (पश्चिम)
मुंबई–४०००२८.
E-mail: info@ldshah.co

### महाराष्ट्र शासन
### सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
रायगड-अलिबाग यांचे कार्यालय
शुक्रतारा बिल्डींग, तळ मजला, सत्कार प्रेस समोर, अलिबाग जि. रायगड
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र. जिउनि/गृह/मोफा क.११/मा.अभि./जाहीर नोटीस/११४९/सन २०२४ दिनांक : ३०/०५/२०२४

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस

अर्जदार हरिद्वार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. मुद्रे बुद्रुक, कर्जत ता. कर्जत जि. रायगड यांनी १) श्री. अनिल नारायण मोरे, २) श्रीमती भारती वसंत भिलारे, ३) श्रीमती अलका सुधाकर कोळी, ४) श्रीमती सपना प्रकाश जाधव (जागामालक) सर्वजण राहणार मु. मुद्रे बुद्रुक, कर्जत, ता. कर्जत जि. रायगड, ५) मेसर्स विवेक फाऊंडेशन तर्फ भागीदार श्री. अनिल लालजीभाई पटेल, श्री. नविन लालजीभाई पटेल, श्री. जितु लालजीभाई पटेल, सर्वजण राहणार रेशमवाला चाळ, जिवदया लेन, घाटकोपर (प) मुंबई ४०० ०८६ यांचेविरुध्द महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांचाचत (मोफा) अधिनियमाचे कलम १९(३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करून मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

**मौजे मुद्रे बुद्रुक ता. कर्जत जि. रायगड येथील सर्व्हे क्रमांक १, हिस्सा क्र. १ अ, भु.क्र. ४ क्षेत्र १०४५.८२ चौ.मी.**

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी क्र. ०५ यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. प्रतिवादी क्र. ०१ ते ०४ नोटीस पाठविण्यांत आली असून सदरच्या नोटीस Not Delivered Insufficent Address असा शेरा मारुन परत आलेली आहे. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतीम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक १३/०६/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक ३०.०५.२०२४

सही/-
(प्र.का. जगताप)
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, रायगड अलिबाग

निवडक

## क्रिकेटमय वातावरण

**न्युयॉर्क** : ज्या देशात बास्केटबॉल आणि बेसबॉलचा बोलबाला असतो. ज्या देशात त्यांनीच शोधून काढलेला अमेरिकन फुटबॉलचा खेळ सर्वाधिक लोकप्रिय असतो. त्याच अमेरिका देशात आताच्या घडीला चर्चा फक्त क्रिकेटची होत आहे. स्थानिक अमेरिकन लोकांना कळू लागले आहे की भारत, पाकिस्तान, बांगलादेश आणि श्रीलंका देशांतील लोकांना प्रेमात पाडणारा क्रिकेट नावाच खेळ आहे तरी काय? मोठ्या उत्सुकतेने लोक क्रिकेटचा खेळ समजून घेण्याचा प्रयत्न करत आहेत.

## ऍरॉनची गेलसोबत बरोबरी

**न्युयॉर्क** : टी-२० विश्वचषकात पहिला सामना अमेरिका आणि कॅनडा या संघात पार पडला. पहिल्याच सामन्यात अमेरिकेने विजय मिळवला. अमेरिकेच्या या विजयात ऍरॉन जॉन्सने मोलाचा वाटा उचलला. जॉन्सने या सामन्यात अमेरिकेसाठी चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करताना ४० चेंडूत ४ चौकार आणि १० षटकारांची बरसात करत नाबाद ९४ धावा फटकावल्या. त्यामुळे त्याने टी-२० विश्वचषकामध्ये एकाच डावात सर्वाधिक षटकार मारणाऱ्या खेळाडूंच्या यादीत ख्रिस गेलची बरोबरी करत दुसरा क्रमांक पटकावला आहे.

## भारतासाठी कडक सुरक्षा

**न्युयॉर्क** : भारतीय क्रिकेट संघ सध्या टी-२० विश्वचषकासाठी न्युयॉर्कमध्ये आहे. भारताला ५ जून रोजी या स्पर्धेतील पहिला सामना खेळायचा आहे. यादरम्यान, भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली आणि भारतीय संघासाठी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवल्याचे दिसून येत आहे. सध्या सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये दिसते की भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली आणि रिंकू सिंग मैदानात येत असताना त्यांच्या आजूबाजूला अनेक सुरक्षारक्षक आहेत. सुरक्षारक्षकांकडे शस्त्रदेखील आहेत.

## अय्यर अडकला लग्नबंधनात

**मुंबई** : कोलकाता नाईट रायडर्सने आयपीएल स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. या विजेतेपदानंतर आता लगेचच अष्टपैलू वेंकटेश अय्यर लग्नबंधनात अडकला आहे. त्याच्या लग्नाचे फोटोही सध्या व्हायरल होत आहेत. वेंकटेश अय्यरने रविवारी (दि.२) पारंपारिक पद्धतीने श्रुती राघुनाथन हिच्याशी लग्न केले. त्यांच्या लग्न समारंभासाठी कुटुंब आणि मित्रपरिवार उपस्थित होता. तसेच, व्हायरल होत असलेल्या फोटोमध्ये दिसते की वेंकटेश आणि श्रुती या दोघांनीही विवाहावेळी पारंपारिक दाक्षिणात्य पद्धतीचे पोषाख परिधान केले आहेत.

## गिलच्या लग्नाची चर्चा

**नवी दिल्ली** : रिद्धिमा पंडित व शुभमन गिल यांच्या लग्नाच्या जोरदार चर्चा रंगल्या आहेत. शुभमन गिलचे नाव सारा तेंडुलकरशी जोडले जात होते, पण आता तो एका टीव्ही अभिनेत्रीशी लग्न करणार असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. पण आता रिद्धिमानेच लग्नाच्या चर्चांवर मौन सोडले आहे. २४ वर्षीय शुबमनशी लग्नाच्या चर्चा ऐकून ३३ वर्षीय रिद्धिमाने संताप व्यक्त केला आहे. लग्नाच्या चर्चांना तिने हास्यास्पद म्हटले आहे. इतकेच नाही तर आपण शुभमनला वैयक्तिकरित्या ओळखत नाही, असे तिने सांगितले.

# भारताचा सराव पक्का

## बांगलादेशचा केला मोठा पराभव

**। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।**
**टी-२० विश्वचषकाच्या एकमेव सराव सामन्यात भारताने बांगलादेशचा ६० धावांनी पराभव केला. भारताने ठेवलेल्या १८३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना बांगलादेशला २० षटकात ९ बाद १२२ धावाच करता आल्या. गोलंदाजीत अर्शदीप सिंग, शिवम दुबे यांनी चांगला मारा केला. तर, फलंदाजीत ऋषभ पंतने ५३ धावांची नाबाद अर्धशतकी खेळी केली. हार्दिक पांड्या देखील फॉर्ममध्ये आला असून त्याने २३ चेंडूत ४० धावा चोपल्या. त्याने ४ षटकार अन् २ चौकार मारले.**



नाणेफेक जिंकून फलंदाजी करणाऱ्या भारताने आपले कॉम्बिनेशन सेट करण्याच्या दृष्टीने अनेक पर्याय चाचपून पाहिले. रोहित शर्माने ऋषभ पंतला तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला पाठवत एक प्रयोग केला. हा प्रयोग जवळपास ५०० पेक्षा जास्त दिवसांनंतर भारतीय जर्सी घालून मैदानावर उतरणाऱ्या ऋषभ पंतने सार्थ ठरवला. त्याने ३२ चेंडूत नाबाद ५३ धावांची खेळी केली. त्यानंतर सूर्यकुमार यादव आणि हार्दिक पांड्याने डाव पुढे नेला. पांड्याने तर तुफान फटकेबाजी करत आयपीएलमधला पांड्या वेगळा अन् भारतीय संघाकडून खेळतानाचा पांड्या वेगळा असतो हे जणू सिद्धच करून दाखवले. त्याने आपल्या ४० धावांच्या खेळीत ३२ धावा या चार षटकार आणि दोन चौकार मारत केल्या. सूर्यकुमार ने १८ चेंडूत ३१ धावा केल्या. त्यामुळे भारतीय संघ २० षटकात ५ बाद १८२ धावांपर्यंत मजल मारू शकला.

यानंतर गोलंदाजीत भारताच्या वेगवान गोलंदाजांनी पॉवर प्लेमध्येच आपली ताकद दाखवून दिली. अर्शदीपने २ तर सिराजने एक शिकार करत बांगलादेशची अवस्था ३ बाद १० धावा अशी करून टाकली. त्यानंतर अक्षर पटेल अन् पांड्याने बांगलादेशची मधली फळी कापत बांगलादेशचा निम्मा संघ ४१ धावात गुंडाळला. मात्र, यानंतर मोहम्मदुल्ला अन् शाकिबने भागीदारी रचत संघाला शतकी मजल मारून दिली. अखेर बुमराहने शाकिबची शिकार करत ही जोडी फोडली. तसेच, रोहितने या सामन्यात दुबेला देखील गोलंदाजी करण्याची संधी दिली. आयपीएलमध्ये गोलंदाजी न करणाऱ्या दुबेने या सामन्यात आपल्या कर्णधाराला नाराज केले नाही. चेंडू अडकून येणाऱ्या खेळपट्टीवर शिवमने ३ षटकात फक्त १३ धावा देत २ बळी देखील टिपले.


### ऋषभ पंतचा धमाका

**अपघातात जखमी झाल्यानंतर ऋषभ पंत जवळपास वर्षभर क्रिकेटच्या मैदानापासून दूर होता. त्याने आयपीएलच्या १७व्या हंगामात पुनरागमन केले अन् दिल्लीसाठी अनेक दमदार खेळी केल्या. मात्र, आंतरराष्ट्रीय स्तरावर पंत कशी कामगिरी करतो याची उत्सुकता सर्वांना लागून राहिली होती. बांगलादेश विरूद्धच्या सराव सामन्यात रोहित शर्माने देखील त्याला तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करण्याची संधी देत त्याला सरावासाठी जास्त चेंडू कसे मिळतील हे पाहिले. पंतने देखील तुफान फटकेबाजी करत ३२ चेंडूत नाबाद ५३ धावा केल्या. अर्धशतकानंतर पंत रिटायर्ड झाला.**

## भारतीय संघाच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह

**। न्यूयॉर्क । वृत्तसंस्था ।**
अमेरिकेत भारतीय संघाच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. या मेगा इव्हेंटपूर्वी अनेकदा दहशतवादी हल्ल्यांच्या बातम्या ऐकल्या आहेत. यादरम्यान न्यूयॉर्कच्या नासाऊ क्रिकेट स्टेडियमवर भारत आणि बांगलादेश यांच्यात खेळल्या गेलेल्यसा सराव सामन्यात एक मोठी घटना घडली. भारतीय क्रिकेट संघाचे चाहते जगाच्या कानाकोपऱ्यात आहेत. विशेषतः रोहित आणि विराटचे. ते सुरक्षेची कोणतीही परवा न करता मैदानावर घुसतात. अनेक आयपीएल मॅचेस आणि इंटरनॅशनल मॅचेसमध्ये हे पाहिले आहे. अशीच घटना भारत-बांगलादेश सामन्यातही पाहायला मिळाली. रोहितला भेटण्यासाठी एका चाहता अचानक मैदानात घुसला. पण अमेरिकन पोलिसांनी त्या चाहत्याला खाली पाडले. यादरम्यान रोहितने पोलिसांना थांबवण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी रोहितचे काही ऐकले नाही.

# दिनेश कार्तिकची निवृत्ती जाहीर





**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
भारताचा अनुभवी यष्टिरक्षक-फलंदाज दिनेश कार्तिकने क्रिकेटच्या सर्व फॉर्मॅटमधून निवृत्ती जाहीर केली. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इन्स्टाग्रामवर एक भावनिक पोस्ट लिहित निवृत्तीची घोषणा केली. त्याने त्याच्या संपूर्ण कारकिर्दीत त्याला पाठिंबा दिल्याबद्दल कुटुंब आणि चाहत्यांचे आभार मानले.

दिनेश कार्तिकने आयपीएलमध्ये आपली चांगली छाप सोडली. दिनेश कार्तिक आयपीएलच्या पहिल्या हंगामापासून खेळतोय. त्याने २५७ सामने खेळले आहेत. तो आयपीएलमध्ये सर्वाधिक सामने खेळणाऱ्यांच्या यादीत रोहित शर्मासोबत संयुक्तरित्या दुसऱ्या स्थानावर आहे. या दोघांच्यावरती फक्त महेंद्रसिंह धोनीचे नाव आहे. त्याने आयपीएलमध्ये २६४ सामने खेळले आहेत. दिनेश कार्तिकने २६ कसोटी सामन्यात १०२५ धावा केल्या आहेत. ९४ सामन्यात १७५२ धावा केल्या आहेत. तर एकूण मिळून ४०१ टी २० क्रिकेटमध्ये दिनेश कार्तिकने ७४०७ धावा केल्या आहेत.

### एमसीए निमंत्रित क्रिकेट स्पर्धा
## रायगडच्या मुलींचा संघ रवाना

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**
महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित मुलींच्या वरीष्ठ गटाच्या एकदिवस क्रिकेट स्पर्धे साठी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वरिष्ठ गटातील मुलींचा संघ संभाजीनगर येथे रवाना झाला आहे. संघाच्या कर्णधारपदी समिधा तांडेल हिची निवड करण्यात आली आहे.

वरिष्ठ गटाच्या मुलींच्या संघाचे प्रशिक्षक म्हणून विनय पाटील तर संघ व्यवस्थापक म्हणून शाम पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुलींच्या संघाला रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे नवनिर्वाचित अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. भविष्यात रायगड जिल्ह्यात मुलींच्या क्रिकेटसाठी नियोजनबद्ध आखणी करून भरपूर स्पर्धा आणि कॅम्पचे आयोजन जिल्हा क्रिकेट असोसिएशन करणार असल्याचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी सांगितले.

## विराट कोहलीचा विशेष सन्मान

**न्युयॉर्क** : विराट कोहलीही टी-२० विश्वचषकासाठी अमेरिकेला पोहोचला आहे. न्यूयॉर्कला पोहोचल्यावर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने विराटचा विशेष सन्मान केला. विराटने २०२३ मध्ये अप्रतिम कामगिरी केली होती. एकदिवसीय विश्वचषकामध्ये कोहलीने ज्या प्रकारे फलंदाजी केली ते कोणीही विसरू शकत नाही. एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके झळकावण्याचा विक्रम केला होता. आता न्यूयॉर्कमध्ये आसीसीने विराट कोहलीला प्लेयर ऑफ द इयर २०२३ या पुरस्काराने सन्मानित केले आहे.

## पांड्याने केल्या भावना शेअर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
भारतीय संघाचा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. मात्र, त्याचे चर्चेत येण्याचे कारण क्रिकेट नसून वैयक्तिक आयुष्य आहे. त्याच्या आणि नताशा स्टॅनकोविकच्या लग्नाबाबत अनेक अफवा आहेत. जवळपास चार वर्षे एकत्र राहिल्यानंतर दोघे वेगळे झाल्याचा दावा केला जात आहे. या सगळ्यापासून दूर असलेला हार्दिक पांड्या अमेरिकेत भारतीय संघासाठी घाम गाळत आहे. बांगलादेशविरुद्धच्या सराव सामन्यात त्याने तुफानी फटकेबाजी केली.

सामना संपल्यानंतर हार्दिक पांड्याने संवाद साधत आपल्या मनातील भावना शेअर केल्या. तो म्हणाला, आयुष्य अनेकदा तुम्हाला कठीण प्रसंगात टाकते. पण मला वाटतं जर तुम्ही खेळ आणि मैदान सोडलं तर तुम्हाला हवं ते मिळणार नाही. हे अवघड आहे पण मी नेहमी करत आलो तेच करत आहे. तो पुढे म्हणाले, या गोष्टी घडतात, कधी चांगला काळ येतो तर कधी वाईट. मी याआधीही अशा प्रसंगातून गेलो आहे आणि मी परतही आलो आहे. मी यशाला फारसे गांभीर्याने घेत नाही. जेंव्हा मी काही चांगलं करतो तेंव्हा मी ते विसरून पुढे जातो. आज कठीण काळातही मी तेच करतो. त्या गोष्टींपासून पळत नाही. मी प्रत्येक गोष्टीचा सामना करतो.

## यजमान अमेरिकेची दमदार सुरुवात

**। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।**
यजमान अमेरिकेने आयसीसी टी-२० विश्वचषकामध्ये धमाकेदार सुरुवात केली आहे. अँड्र्यू गॉस आणि ॲरॉन जोन्स या जोडीने तुफानी फलंदाजी करत कॅनडाच्या गोलंदाजांना सळोकी पळो करून सोडले. सह-यजमान अमेरिकेने आसीसी टी-२० विश्वचषकाच्या पहिल्या सामन्यात कॅनडाचा सात गडी राखून पराभव करून विजयासह आपल्या मोहिमेची सुरुवात केली.





प्रथम फलंदाजी करताना नवनीत धालीवाल आणि निकोलस किर्टन यांच्या अर्धशतकांच्या जोरावर कॅनडाने २० षटकांत ५ गड्यांच्या मोबदल्यात १९४ धावा केल्या, पण प्रत्युत्तरात अमेरिकेने १७.४ षटकांत तीन गड्यांच्या मोबदल्यात १९७ धावा करत विजयाची नोंद केली. अमेरिकेकडून ॲरॉन जोन्सने दमदार फलंदाजी करत ४० चेंडूत ४ चौकार आणि १० षटकारांच्या मदतीने नाबाद ९४ धावा केल्या. ॲरॉनने अँड्रिससोबत तिसऱ्या विकेटसाठी १३१ धावांची भागीदारी केली. अँड्रिसनेही ४६ चेंडूंत सात चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने ६५ धावा केल्या आणि अमेरिकेच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.

# बांगलादेश संघाला मोठा धक्का

## मॅचदरम्यान स्टार खेळाडू जखमी

**। न्यूयॉर्क । वृत्तसंस्था ।**
भारताविरुद्धच्या सराव सामन्यात बांगलादेश संघाला ६० धावांनी पराभव स्वीकारावा लागला. या सामन्यात बांगलादेशचा एक स्टार खेळाडू जखमी झाला असून टी-२० विश्वचषकाच्या पहिल्या सामन्यात खेळणे कठीण दिसत आहे. कारण त्याच्या डाव्या हाताला सहा टाके पडले.



भारताविरुद्धच्या सराव सामन्यात बांगलादेशचा वेगवान गोलंदाज शरीफुल इस्लामला दुखापत झाली आहे. भारताविरुद्ध त्याला चार षटकांचा कोटा पूर्ण करता आला नाही. त्याने भारतीय डावातील शेवटचे षटक टाकले आणि या षटकाच्या पाचव्या चेंडूवर शॉरीफुल इस्लामने यॉर्कर चेंडू टाकला, आणि हार्दिक पांड्याने जोरात मारला. आणि चेंडू त्याच्या दिशेने गेला जो हाताला लागला. त्यानंतर त्याचा हात सुजला. त्यामुळे शॉरीफुल इस्लाम मैदानाबाहेर गेला.

शॉरीफुल इस्लामची ही दुखापत बरी होण्यासाठी किमान एक आठवडा लागेल. त्यामुळे विश्वचषकातील बांगलादेशच्या पहिल्या सामन्यात खेळणे त्याच्यासाठी कठीण आहे. बांगलादेशला ८ जूनला श्रीलंकेविरुद्ध सामना खेळायचा आहे. शरीफुलची दुखापत बांगलादेशसाठी मोठ्या धक्क्यापेक्षा कमी नाही.

## संजय मांजरेकरांचे मोठे वक्तव्य

**नवी दिल्ली** : शनिवारी भारताने बांगलादेशविरुद्ध सराव सामना खेळला. या सामन्या दरम्याना लिटनने जडेजाविरुद्ध स्टंपिंगचे अपील केले, तेव्हा संजय मांजरेकर म्हणाले, इथून पाहिल्यास तो बाद आहे असे दिसते. पण जडेजा फलंदाजी करत आहे. त्यामुळे मला तोंड बंद ठेवावे लागेल. मांजरेकरांची ही प्रतिक्रिया सध्या सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. संजय मांजरेकर आणि रवींद्र जडेजा यांच्यातील वाद जुना आहे. दोघांनी सोशल मीडियावर अनेकदा एकमेकांविरोधात वक्तव्ये केली आहेत.

# रायगडच्या खेळाडूंचे उज्वल यश

**। नागोठणे । वार्ताहर ।**
अर्नाळा विरार येथे नुकत्याच पार पडलेल्या सीकेएफ नॅशनल कराटे चॅम्पियनशिप २०२४ या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील मार्शल आर्ट स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंनी उज्वल यश संपादन केले आहे.



यामध्ये महाराष्ट्रातून रायगड जिल्ह्यातील मार्शल आर्ट स्पोर्ट्स अकॅडमीचे मास्टर कल्पेश शिंदे तसेच प्रशिक्षक रिया पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली १७ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यामध्ये रायगडच्या खेळाडूंनी १२ सुवर्ण, ९ रौप्य व ११ कांस्यपदकांची कमाई करीत रायगड जिल्ह्याचे नाव क्रीडा क्षेत्रामध्ये उंचावला आहे.

रायगडच्या यशस्वी खेळाडूंमध्ये खोपोली येथील मानवी तिवारी, रिहान वाणी, आरसी यादव या तिघांनी सुवर्णपदक, तर नम्ब्रा खुरेशी रौप्यपदक व दक्ष पाठारे कांस्यपदक असे यश मिळविले.तसेच, नागोठण्यातील आयुष पवार याने कांस्यपदक, इंदापूर येथील पुष्पम पवार रौप्य पदक, जिंदाल स्कूल मधील आराध्य शिरसे व वेद खडतर यांनी सुवर्णपदक, तर, करण जाधव याने रौप्यपदक व प्रथमेश म्हात्रे याने सुवर्ण पदक मिळविले.

# भारताचा विश्वविजेत्या जर्मनीला पराभवाचा धक्का

***। लंडन । वृत्तसंस्था ।***
***हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाने प्रो हॉकी लीगच्या लंडन टप्प्यात विश्वविजेत्या जर्मनीचा धक्कादायक पराभव केला. स्वतः ड्रॅग फ्लिकर असलेल्या हरमनप्रीतने १६व्या, सुखजीत सिंगने ४१व्या तर गुरजंत सिंगने ४४व्या मिनिटाला गोल केले. जर्मनीने या सामन्यात प्रामुख्याने नवोदितांना संधी दिली; पण त्यांनीही जोरदार आक्रमणाने सुरुवात केली होती; मात्र भारतीयांच्या नियोजित खेळासमोर त्यांची खेळी मात्र चालली नाही.***

*जागतिक क्रमवारीत पाचव्या स्थानावर असलेल्या भारताचे या प्रो हॉकीत १३ सामन्यांतून २४ गुण झाले असून ते तिसऱ्या स्थानावर आहेत. अँटवर्प टप्प्यात भारताचा दोनदा पराभव करणारे अर्जेंटिना १४ सामन्यांत २६ गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर आहेत. तर, १२ सामन्यांतून २६ गुणांची कमाई करणारे नेदरलँड्स पहिल्या क्रमांकावर आहेत. जर्मनीच्या संघाने पहिल्या सत्रात बेधडक खेळ केला; परंतु, त्यांची आक्रमणे भारताचा अनुभवी गोलरक्षक श्रीजेशनने यशस्वीपणे थोपविली.*



*भारतालाही पहिल्या दोन पेनल्टी कॉर्नरवर गोल करता आले नाहीत; परंतु, दुसऱ्या सत्राच्या पहिल्याच मिनिटाला हरमनप्रीतने पेनल्टी कॉर्नरवर गोल केला. त्यानंतर सुखजीतने ४१व्या मिनिटाला भारताची आघाडी दुप्पट केली. अभिषेकच्या पासवर त्याने जर्मन गोलरक्षकाला पुरते चकविले.*

*तीन मिनिटांनंतर गुरजंतने भारताचा तिसरा गोल केला. ०-३ अशा पिछाडीनंतर जर्मनीच्या खेळाडूंनी आपले आक्रमण अधिक धारदार केले, भारतीय गोलक्षेत्रात त्यांनी प्रवेशही केला; परंतु, त्यांना पुन्हा एकदा श्रीजेशची भिंत भेदता आली नाही. भारताचा जर्मनीविरुद्धचा पुढचा सामना ८ जून रोजी होणार आहे. तर, ग्रेट ब्रिटनविरुद्धच्या लढती २ आणि ९ जून रोजी आहेत.*

# विश्वचषकातून दोन खेळाडूंचा पत्ता कट?

**। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।**
भारतीय संघ ५ जूनपासून टी-२० विश्वचषकामध्ये आयर्लंड विरूद्ध आपल्या मोहिमेला सुरुवात करणार आहे. याआधी भारतीय संघ आणि बांगलादेश यांच्यात सराव सामना झाला होता. या सामन्यात दोन खेळाडूंनी खराब कामगिरी करून कर्णधार रोहितला नाराज केले. आता या खेळाडूंचा प्लेइंग इलेव्हनमधून पत्ता कट होऊ शकतो.

आयपीएलमध्ये संजूने अप्रतिम कामगिरी केली होती. त्यामुळे त्याला संघात स्थान मिळाले. मात्र, सराव सामन्यातच संजू फ्लॉप ठरला. रोहितसह संजूने डावाची सुरुवात केली. पण संजूने ६ चेंडूंचा सामना केला आणि केवळ एक धाव घेतली. ऋषभ पंतच्या शानदार खेळीनंतर प्लेइंग इलेव्हनमध्ये संजूच्या जागी पंतला संधी मिळू शकते असे दिसते. शिवाय अष्टपैलू शिवम दुबे याचीही विश्वचषकासारख्या मोठ्या स्पर्धेसाठी पहिल्यांदाच निवड झाली. शिवमला बॅट आणि बॉल अशा दोन्ही प्रकारे कामगिरी करण्याची संधी मिळाली. दुबेने गोलंदाजीत चमकदार कामगिरी केली, तर फलंदाजीत पुन्हा एकदा निराशा केली. फलंदाजीतील शिवमची ही खराब कामगिरी त्याला प्लेइंग इलेव्हनमधून बाहेर काढू शकते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)